




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६४ वे * अंक ३१६ * नांदेड * बुधवार, दि. २६ नोव्हेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर टांगती तलवार कायम

## पुढील सुनावणी आता शुक्रवारी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या ओबीसी आरक्षणासंबंधीच्या याचिकेवर दि. २५ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी सॉलिसिटर जनरल याप्रकरणात वेळ आणखी वाढवून देण्याची मागणी केली. ही मागणी मान्य करत सर्वोच्च न्यायलायने याप्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी (२८ नोव्हेंबर) ठेवली आहे. त्यामुळे सुनावणी लांबल्याने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर टांगती तलवार कायम आहे.

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायत निवडणुकांच्या निवडणुका जाहीर झाल्या असून आता प्रचारही अंतिम टप्प्यात आला आहे. त्यामुळे, निवडणूक आयोगाकडून सर्व प्रक्रिया पार पडताना दिसून येते. या निवडणुकांसाठी येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होऊन ३ डिसेंबर रोजी मतदान पार पडेल. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून ओबीसी आरक्षण प्रश्नी आज पुन्हा एकदा या याचिकांवर सुनावणी पार पडली. आता, पुढील सुनावणी शुक्रवारी दुपारी २ वाजता होणार आहे. याबाबत सध्यातरी कोणताही निर्णय कोर्टाने घेतला नाही. त्यामुळे, आता शुक्रवारी होणाऱ्या निवडणुकांकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मात्र, सध्या जाहीर झालेल्या निवडणुकाचं काय होणार, असा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. त्यावर, ओबीसी



नेते प्रकाश शेंडगे यांनी आपली भूमिका मांडली.

सर्वोच्च न्यायालयात विकास गवळी यांनी दाखल केलेल्या याचिकेत असा दावा आहे की, काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाचा अनुपात घटनात्मक ५० टक्के मर्यादेपेक्षा जास्त ठेवण्यात आला आहे, जे कायद्याच्या विरोधात आहे. मात्र, बांठिया आयोगाच्या अहवालाचा संदर्भ घेत आरक्षणाची रचना योग्य पद्धतीने करण्यात आली आहे, असा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. त्यामुळे, आरक्षणाची ही लढाई आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचली आहे. याबाबत बोलताना ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी वर्तमान जाहीर झालेल्या निवडणुकांचं काय होणार, यावर भाष्य केलं.

राज्यात सध्या नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे, कायद्यातील आर्टिकल २३१ बी नुसार घटनेत अधिकार आहेत. प्रक्रिया सुरू झालेल्या निवडणुका थांबवता येत नाहीत. त्यामुळे, मला वाटतय नगरपालिका नगरपरिषद निवडणुका पार पडतील. केवळ, जिल्हा परिषद महानगरपालिकेच्या निवडणुकीबाबत मात्र कोर्ट काहीतरी निर्णय घेईल, असे प्रकाश शेंडगे यांनी म्हटले. तसेच, आम्ही ओबीसी उमेदवार निवडणुकीत उतरवत आहोत, आम्ही लढाई सोडणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# नांदेड महापालिकेच्या मतदार यादीत पश्चिम बंगालचेही मतदार

## एकाच घर क्रमांकावर पन्नासहून अधिक मतदारांची नोंद, घर क्रमांकच नसलेल्या मतदारांचीही मोठी संख्या, महापालिकेच्या आरक्षणावर एकूण दहा आक्षेप

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मतदार यादीवर २७ नोव्हेंबरपर्यंत आक्षेप घेता येणार आहे. या आक्षेपादरम्यान नांदेड महापालिकेच्या मतदार यादीत पश्चिम बंगालचे जवळपास ७०० ते ८०० मतदार असल्याचा धक्कादायक आक्षेप नोंदविण्यात आला आहे. तसेच एकाच घर क्रमांकावर ५५ हून अधिक मतदारांची नोंद आहे. तसेच घर क्रमांक नसलेल्या मतदारांचीही मोठी संख्या आढळली आहे. मतदार यादीत या प्रभागातील नावे त्या प्रभागात असा प्रकारही उघडकीस आला आहे. माजी नगरसेवक तथा शिवसेनेचे शहरप्रमुख तुलजेश यादव यांनी या सर्व प्रकाराबाबत वजिराबाद आणि इतवारा क्षेत्रीय कार्यालयात आक्षेप दाखल केले आहेत.

महापालिका निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप मतदार यादीत ५ लाख १ हजार ८०३ मतदारांचा २० प्रभागात समावेश आहे. या प्रारूप मतदार याद्या महापालिकेच्या मुख्यालयासह क्षेत्रीय कार्यालय आणि महापालिकेच्या वेबसाईटवरही उपलब्ध आहेत. या प्रारूप मतदार याद्यावर नागरिकांना २७ नोव्हेंबरपर्यंत आक्षेप हरकती दाखल करता येणार आहेत. या आक्षेप आणि हरकती क्षेत्रीय कार्यालयात दाखल करता येतील यासाठी नागरिकांना प्रपत्र आणि ब मध्ये आपले आक्षेप सूचना दाखल करता येतील प्रपत्र मध्ये स्वतःबाबत



तर प्रपत्र ब मध्ये इतरांबाबत आक्षेप घेता येतील.

आक्षेपांची प्रक्रिया सुरू असताना शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख तुलजेश यादव यांनी २४ नोव्हेंबर रोजी वजिराबाद आणि इतवारा क्षेत्रीय कार्यालयात आपले आक्षेप नोंदवले आहेत. या आक्षेपामध्ये त्यांनी प्रभाग क्रमांक १५ मध्ये होळी, मन्यार गल्ली या भागातील यादी क्रमांक १४९, १५९ मध्ये ७०० ते ८०० नावे ही पश्चिम बंगालमधील मतदारांची असल्याचा आक्षेप दाखल केला आहे. त्याचवेळी एकाच घर क्रमांकावर तब्बल ५५ मतदारांची नावे यादीमध्ये समाविष्ट केल्याची बाबही पुढे आणली आहे. तसेच मतदार याद्यावर घर क्रमांक नसतानाही अनेक मतदारांची नावे यादीत समाविष्ट केली आहेत. हा आकडा जवळपास २०० ते ३०० पर्यंतचा आहे. त्यामुळे मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ असल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख यादव यांनी केला आहे.

दुसरीकडे ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या आरक्षण सोडतीचा निकाल १७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. या प्रारूप आरक्षणावर २४ नोव्हेंबरपर्यंत हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या होत्या. महापालिकेच्या आरक्षणावर २४ नोव्हेंबरपर्यंत एकूण १० आक्षेप निवडणूक विभागाकडे प्राप्त झाले आहेत. या आक्षेपावर आता १ डिसेंबर २०२५ रोजी निर्णय घेतला जाईल. अंतिम आरक्षण हे २ डिसेंबर रोजी राजपत्रात अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केले जाईल, अशी माहिती निवडणूक विभागाचे उपायुक्त नितीन गाढवे यांनी दिली.

संपूर्ण देशभर मतदार याद्यांचा घोळ आणि मतचोरीबाबत तक्रारी सुरू असताना नांदेडमध्येही मतदार याद्यांमध्ये एकाच ठिकाणी एकाच घर क्रमांकावर ५० ते ५५ मतदारांची नावे आढळून आली आहेत. तसेच अनेक मतदार हे कोणताही घर क्रमांक नसलेल्या ठिकाणी नोंदवण्यात आले आहेत. पश्चिम बंगालमधील मतदारांचाही या यादीत समावेश असल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे देशभरातील हा मुद्दा आता थेट नांदेडपर्यंत पोहोचला आहे. या आक्षेपाबाबत नांदेड महापालिकेच्या उपायुक्त अभिजीत वायकोस यांच्याशी संपर्क साधला असता मतदार याद्या या आम्हाला निवडणूक आयोगाकडून प्राप्त झाल्या आहेत. या मतदार याद्यामध्ये कोणताही बदल करणे, स्थानिक पातळीवर शक्य नाही. एखाद्या मतदाराचे नाव या प्रभागातून त्या प्रभागात बदलणे शक्य आहे, मात्र नाव वगळण्याचे कोणतेही अधिकार स्थानिक पातळीवर नाहीत. केंद्रीय निवडणूक आयोगाकडेच हे अधिकार आहेत. मतदार याद्यावरील आक्षेपांची निश्चितपणे दखल घेतली जाईल, आलेल्या आक्षेपांची पडताळणीही केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उद्या लोह्यात जाहीर सभा

## आ. चिखलीकर यांच्याबद्दल काय बोलणार? याकडे सर्वांचे लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा व कंधार नगरपरिषद निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दि. २७ नोव्हेंबर रोजी लोहा येथे जाहीर सभा होणार आहे. या सभेत मुख्यमंत्री फडणवीस हे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्याबद्दल काय बोलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सभेला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री व नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे आदी नेते प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे प्रभारी एकनाथ पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २७ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता बैल बाजार, लोहा येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची जाहीर सभा होईल. लोहा नगरपरिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गजानन सूर्यवंशी तसेच कंधार नगरपरिषदेतील भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गंगाप्रसाद यन्नावार यांच्यासह दोन्ही शहरातील नगरसेवकपदांचे भाजपचे उमेदवार या सभेला उपस्थित राहणार आहेत. या सभेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते राम मंदिराच्या शिखरावर भगवा फडकला

**अयोध्या (प्रतिनिधी)–** अयोध्येतील राम मंदिरात आज ध्वजारोहण समारंभ पार पडला. अयोध्येत राम मंदिराच्या शिखरावर अखेर भगवा फडकला आणि समस्त हिंदूंचे स्वप्न साकार झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असल्याचे या ध्वजारोहण सोहळ्यातून अधोरेखित झाले आहे.



राममंदिरात ध्वजारोहण करण्यापूर्वी पंतप्रधान मोदी आणि सरसंघचालकांनी गाभाऱ्यात मंत्रोच्चारांच्या घोषात पूजा आणि आरती केली. यानंतर पंतप्रधान, सरसंघचालक आणि उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वज इलेक्ट्रीक बटण दाबताच फडकवण्यात आला. हिंदुच्या विजयाची निशाणी असलेला हा ध्वज जमिनीपासून १९१ फूट उंचीवर आहे. ज्याच्या मध्यभागी सूर्य आणि त्यामध्ये ओमचे चिन्ह आहे. तसेच अयोध्याचे राजवंशीय चिन्ह असलेले कोविदार वृक्ष आहे.

# रोहित शर्मा टी-२० विश्वचषकाचा ब्रँड ॲम्बेसेडर

**दुबई (प्रतिनिधी)–** भारताच्या माजी कर्णधार आणि दोन वेळा टी-२० विश्वचषक विजेता रोहित शर्मा याची आगामी टी-२० विश्वचषक २०२६ साठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारत आणि श्रीलंका येथे ७ फेब्रुवारीपासून ८ मार्चपर्यंत होणाऱ्या या स्पर्धेत रोहित या नव्या भूमिकेतून सहभागी होणार आहेत. रोहितने २०२४-मध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करत त्यांना टी-२० विश्वचषक जिंकवला होता.

# गुटखा, सुगंधी सुपारी विक्रेत्यांना लागणार मकोका

**मुंबई (प्रतिनिधी)–** गुटखा, सुंगधी सुपारीवर बंदी असूनही शाळा व महाविद्यालयांच्या परिसरातील दुकानांत त्यांची सर्रास विक्री केली जाते. अनेकदा माल जप्त करून तसेच पोलीस कारवाई करूनही ही विक्री होत असल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने याविरोधात कठोर पावले उचलली जाणार आहेत. गुटखा विक्रीला चाप लावण्यासाठी गुटख्यासह सुगंधी सुपारी विक्रेत्यांनाही मकोकाच्या कक्षेत आणले जाणार आहे. तसा प्रस्तावच विधी व न्याय विभागाला पाठविण्यात येणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिली.

गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, सुपारी, खर्रा व मावा यांसारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन व विक्री संपुष्टात आणण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) केलेल्या कारवाईत मागील सात महिन्यांत तब्बल २२ कोटी १७ लाख ८९ हजार ९१४ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. १ एप्रिल ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत एफडीएने ३६५ दुकानांवर छापे टाकले, त्यापैकी ३५४ दुकानांत प्रतिबंधित गुटखा, सुगंधी सुपारीचा साठा आढळला.

परराज्यातून अवैध मार्गाने मोठ्या प्रमाणात गुटखा आणि सुगंधी सुपारी आणली जाते. या पार्श्वभूमीवर जप्ती आणि फौजदारी कारवाई नंतरही विक्री होत असल्याने या गुन्हेगारी साखळीला रोखण्यासाठी 'महाराष्ट्र संघटित गुन्हे प्रतिबंधक कायदा' (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचा निर्णय अन्न व औषध प्रशासन विभागाने घेतला असून तसा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे.

# राज्याच्या तापमानात वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील तापमानात गेल्या दोन दिवसांपासून वाढ झाली आहे. ज्या भागात ७ ते ८ अंश सेल्सिअसदरम्यान किमान तापमान नोंदले जायचे त्या भागातील किमान तापमानाचा पारा आता १४ ते १५ अंशादरम्यान गेला आहे. दरम्यान, पुढील काही दिवस तापमानातील ही वाढ कायम राहणार आहे. याचबरोबर बंगालच्या उपसागरात बुधवारी चक्रीवादळ निर्माण होण्याचा अंदाज आहे. परिणामी काही भागात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

सध्या उत्तरेकडून येणारे थंड वाऱ्यांचे प्रवाह कमी झाले आहेत. मागील दोन दिवसांचे किमान तापमान पाहता त्यात बऱ्यापैकी वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी राज्यात सर्वाधिक कमी किमान तापमानाची नोंद ही ७ ते ९ अंशा दरम्यान होत होती. आता त्यात ४ ते ५ अंशानी वाढ होऊन तापमान १५ अंशावर पोहोचले आहे. त्यामुळे नागरिकांना उकाडा सहन करावा लागत आहे. मुंबईतही हीच परिस्थिती आहे. मुंबईत गेले काही दिवस तापमान कमी झाले होते. साधारण १६ ते १८ अंशादरम्यान तापमान नोंदले जात होते.









# भारतविरूद्ध द. आफ्रिका कसोटी : भारतासमोर ५४९ धावांचं लक्ष्य

**गुवाहाटी (प्रतिनिधी)–** गुवाहाटीत सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटीत चौथ्या दिवसाचा खेळ जसजसा पुढे सरकतोय, तसतसा भारताचा पराभव जवळ आल्याचं चित्र अधिक स्पष्ट होत चाललं आहे. दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावातही सावध पण प्रभावी खेळ करत भारतासमोर तब्बल ३९५ धावांची मोठी आघाडी उभी केली आहे.

दरम्यान, अनुभवी ऑफस्पिनर आर. अश्विनने भारतीय खेळाडूंच्या बॉडी लँग्वेजवर नाराजी व्यक्त केली असून, फलंदाजांकडून दुसऱ्या डावात लढाऊ खेळीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

टॉस जिंकून प्रथम फलंदाजी घेतलेल्या दक्षिण आफ्रिकेने ४८९ धावांचा मजबूत पाडाव उभारला. सेनुरन मुथुसामीने १०९ धावांचे दमदार शतक ठोकत संघाला मजबूत पाया दिला, तर मार्को यानसेनने ९३ धावांची झंझावाती खेळी करून भारतावर प्रचंड दडपण आणले.

पहिल्या डावात भारताचा डाव २०१ धावांवर कोसळला. त्यानंतर ऋषभ पंतचा फोटो शेअर करत अश्विनने 'दुसऱ्या डावात चांगली फलंदाजी करून सामना स्पर्धेत आणावा' अशी इच्छा व्यक्त केली. मात्र, मैदानावरील बॉडी लँग्वेज चिंताजनक आहे असे म्हणत त्याने ब्रोकन हार्टचे इमोजी पोस्ट करत चिंता व्यक्त केली.

तीन डावांच्या खेळीत भारताच्या फलंदाजीत सातत्याचा पूर्णतः अभाव दिसून आला आहे. केवळ यशस्वी जैस्वालनेच ५८ धावांचे अर्धशतक झळकावून प्रत्युत्तर दिले. कोलकात्यातील पहिल्या कसोटीत भारताला केवळ १२४ धावांचे लक्ष्यही पार करता आले नव्हते. आता गुवाहाटी सामना ड्रॉमध्ये गेला तरी दक्षिण आफ्रिका मालिका जिंकणार हे निश्चित आहे.

दुसऱ्या डावात जोखीम न घेता बाद न होता खेळण्यावर आफ्रिकेने भर दिला आणि त्यांची आघाडी ४०० धावांच्या पुढे गेली. भारताला फॉलोऑनपासूनही बचाव करता आला नाही. भारतीय मैदानावर शेवटच्या डावात ४०० हून अधिक धावांचे लक्ष्य पार करण्याचा पराक्रम आजवर कुणालाही जमलेला नाही.

दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना दक्षिण आफ्रिकेने ३० धावांनी जिंकला होता. आता दुसऱ्या कसोटीतही भारताची स्थिती डळमळीत दिसतेय. दक्षिण आफ्रिकेने हा सामना जिंकला तर ते मालिकेत २-० असा निव्वळ विजय मिळवून 'क्लीन स्वीप' नोंदवतील.

# टी-२० विश्वचषक स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** टीम इंडियाचा धडाकेबाज फलंदाज रोहित शर्माच्या नेतृत्वात भारताने गत २०२४ चा टी-२० विश्वचषक उंचावत जगभरातील क्रिकेट विश्वात आपला दबदबा कायम केला. क्रिकेटचाहत्यांची पंढरी असलेल्या भारतात निवडणुकांप्रमाणेच क्रिकेट स्पर्धांची उत्सुकता पाहायला मिळते. त्यामुळे, गतवर्षी चॅम्पियन ट्रॉफी जिंकल्यानंतर आता भारतीय संघाला आणि क्रिकेट चाहत्यांना आगामी टी-२० विश्वचषकाची उत्कंठा लागून राहिली आहे. विशेष म्हणजे यंदाचा टी-२० वर्ल्डकप भारतात होणार असून ७ फेब्रुवारीपासून टी-२० विश्वचषकाच्या १० व्या पर्वाला सुरुवात होणार आहे. तर, भारत पाकिस्तान यांच्यातील पहिला सामना १५ फेब्रुवारी होत आहे. तर, अंतिम सामना ८ मार्च २०२६ रोजी अहमदाबाद येथे होणार आहे.

आयसीसीचे अध्यक्ष जय



शहा तसेच रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि हरमनप्रीत कौर यांच्या उपस्थितीत टी-२० विश्वचषकाच्या वेळापत्रकाची घोषणा करण्यात आली. यंदाही विश्वचषक स्पर्धेत एकूण २० संघांचा असणार समावेश असणार आहे. यंदाच्या टी-२० विश्वचषकाचं आयोजन भारत आणि श्रीलंकेत असल्याने भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी ही पर्वणी ठरणार आहे. १० वर्षांनंतर पहिल्यांदाच हा विश्वचषक भारतात आयोजित करण्यात येत आहे. मुंबईसह, दिल्ली, चेन्नई, कोलकत्ता आणि अहमदाबाद येथे विश्वचषकाचे सामने होणार आहेत. तसेच श्रीलंकेतील चार ठिकाणच्या मैदानावर देखील टी-२० सामने खेळवले जातील. विशेष म्हणजे रोहित शर्मा टी-२० विश्वचषकाचा ब्रँड एम्बॅसिडर असणार आहे. रोहितने जून २०२४ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेतून निवृत्ती घेतली आहे.

टी-२० विश्वचषकाच्या ग्रुप स्टेजमधेच भारत आणि पाकिस्तान एकमेकांना भिडणार आहेत. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघाचा एकाच ग्रुपमध्ये समावेश असून ग्रुप 'ए' मध्ये भारत आणि पाकिस्तानसह, अमेरिका नेदरलँड्स आणि नामिबियाचा समावेश आहे.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# अफगाणिस्तानची जलनीती: पाकिस्तानला झटका

'खून और पानी एकसाथ नही बहेंगे' असे स्पष्ट जाहीर करून भारताने सिंधू जल करार गुंडाळण्याचा विचार आपल्या देशाने पुढे आणला, तेव्हा जगातील महाशक्तींनाही याचा धक्का बसला. दहशतवादाच्या विरोधात पाणी हे सामरिक अस्त्र ठरू शकते, याची भारताने जाणीव करून दिली होती. आज हीच रणनीती अफगाणिस्तानने पाकिस्तानविरुद्ध वापरायला सुरुवात केली आहे, हे निश्चितच भू-राजकीय दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. भारताची इच्छा अफगाणिस्तान-कडून पूर्ण होते आहे. यालाच म्हणतात पाहुण्याच्या काठीने साप मारणे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव गेल्या काही महिन्यांत झपाट्याने वाढला आहे. २,६४० किलोमीटर लांबीच्या ड्युरंड रेषेवरील सीमावाद तर कायमच आहे, पण आता तो उघड संघर्षात परिवर्तित होत आहे. ११ ऑक्टोबर रोजी झालेल्या हिंसक चकमकींमध्ये दोन्ही बाजूंनी मोठ्या शस्त्रांचा आणि रणगाड्यांचा वापर झाला. या घटनांनी दोन्ही देशांमधील संबंध आणखी बिघडले. अशा परिस्थितीत तालिबान सरकारने कुनार नदी-वर विशाल धरण बांधण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे पाकिस्तानला पुरवले जाणारे पाणी मोठ्या प्रमाणावर कमी होणार आहे. हा निर्णय केवळ जल व्यवस्थापनापुरता मर्यादित नसून, पाकिस्तानवर दबाव आणण्याचे सामरिक पाऊल आहे. कुनार (चित्राल) नदी अफगाणिस्तानातून पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रदेशात प्रवेश करते आणि त्या भागातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. तालिबानच्या धरणामुळे या भागात पाण्याची उपलब्धता घटल्यास पाकिस्तानसमोर अन्नसुरक्षा आणि सामाजिक असंतोषाचे गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतात. जलसंपत्तीवर नियंत्रण हे आजच्या काळात सामरिक शक्तीचे मोठे प्रतीक बनले आहे. भारताने जसे सिंधू कराराच्या पुनर्विचाराचा इशारा देऊन पाकिस्तानच्या मनोबलावर प्रहार केला होता. तसेच आता तालिबानही करताना दिसतो. पाकिस्तानने अलीकडेच काबूल प्रांतात हवाई आणि जमिनीवरील कारवाई केली होती. या कारवाईत दोन्ही बाजूंचे नुकसान झाले, पण तालिबानच्या विरोधात पाकिस्तानचा आक्रमक दृष्टिकोन त्याच्याच उलट परिणाम घडवून आणतो आहे. कुनार नदी-वरील धरण बांधणी हे त्याचेच प्रत्युत्तरात्मक रूप आहे, एक प्रकारचा 'जलप्रतिहल्ला'. तालिबानने दिलेला संदेश स्पष्ट आहे: आता पाण्याच्या प्रत्येक थेंबावर आमचे नियंत्रण असेल. पाकिस्तानसाठी पाण्याचा प्रश्न आधीच गंभीर आहे. हवामान बदल, अनियमित पाऊस, धरणांची कमतरता आणि जलस्रोतांचे असमान वितरण यामुळे त्याच्या शेतीवर आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. अशा वेळी अफगाणिस्तानकडून येणारे पाणी थांबले, तर पाकिस्तानची अडचण अधिकच वाढेल. या सर्व घडामोडींमध्ये भारताची भूमिका उल्लेखनीय आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील ऐतिहासिक संबंध, तसेच पाकिस्तानविरुद्ध असलेले समान हितसंबंध, या दोन्हींच्या पार्श्वभूमीवर तालिबानच्या पावलांचा अप्रत्यक्ष फायदा भारतालाही होऊ शकतो. दक्षिण आशियात पाणी हे आता केवळ नैसर्गिक साधन नसून, राजकीय आणि सामरिक शस्त्र बनले आहे. सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा किंवा कुनार या नद्यांच्या प्रवाहावर नियंत्रण मिळवणे म्हणजे शेजारी राष्ट्रांवर प्रभाव राखणे. अफगाणिस्तानने घेतलेले हे पाऊल जागतिक पातळीवरही लक्षवेधी ठरणार आहे. कारण पाणीपुरवठ्याच्या माध्यमातून दबाव आणण्याची पद्धत ही भविष्यातील आंतरराष्ट्रीय राजकारणात नवी परिभाषा घडवू शकते. पाकिस्तानसारख्या देशाला दहशतवादाचा प्रत्यक्ष फटका आता पाण्याच्या स्वरूपात बसत आहे, हे त्याच्यासाठी इतिहासाचा मोठा धडा आहे. शेवटी प्रश्न असा उरतो की पाकिस्तानने स्वतःच्या भूभागात दहशतवादाच्या बिया पेरल्या, पण आता त्या झाडाच्या फांद्या त्याच्यावर उलटल्या आहेत. दहशतीला आश्रय देणारा देश आज पाण्यासाठी झगडतो आहे. हे केवळ अफगाणिस्तानच्या धरणाचे नव्हे, तर पाकिस्तानच्या धोरणांचेही अपयश आहे. दक्षिण आशियातील पाणी युद्धाची ही नव्या युगाची सुरुवात ठरू शकते, आणि भारताने यातील घडामोडींवर सतत बारीक लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

# मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी भारतीय राज्यघटना




भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान द्रष्टे नेते व युगपुरूष होते. समाजातील उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अद्वितीय असे आहे. अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करीत त्यांनी देशात व परदेशात शिक्षण घेतले. आपल्या प्रकांड बुद्धिमत्तेचा ठसा त्यांनी प्रदेशातील शिक्षण संस्थांवर उमटविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकारांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांत प्रचंड योगदान दिले. आधुनिक भारताला त्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे भारतीय राज्यघटना. जगातील श्रेष्ठ घटनांमध्ये आपल्या देशाच्या घटनेचा समावेश होतो. समता, बंधुभाव आणि न्याय ही तत्वे आपल्या घटनेचा भक्कम पाया आहेत. भारतीय संविधानामुळे देशाला लोकशाही व्यवस्था मिळाली. समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांना विकास आणि प्रगती साध्य करण्याची समान संधी राज्यघटनेने दिली.

आपल्या देशाची अखंडता आणि एकता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे फार मोठे योगदान आहे. ही गोष्ट कुणालाही नाकारता येणार नाही. राज्यघटनेने देशातील सर्व नागरिकांना मूलभूत हक्क आणि न्यायाची हमी दिली. आपली राज्यघटना मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी आहे. म्हणूनच आपल्या देशाची राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आहे. जगातील अनेक देशांनी राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आणि अद्वितीय असल्याचे मान्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक श्रेष्ठ संविधानतज्ज्ञ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ६० पेक्षा जास्त देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास केला होता. त्यांचा कायदा आणि संविधानाबाबत सूक्ष्म आणि सखोल अभ्यास होता. जगातील कोणत्याही राज्यघटनेत तरतूद नसलेली कलम म्हणजे मूलभूत हक्काची असलेली कलम १२-३६ बहाल केली. कलम ३२ ला तर डॉ. बाबा साहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचे हृदय म्हटलेले आहे. कारण या कलमाद्वारे आपल्या हकावर कोणीही गदा आणत असेल तर आपल्याला सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. प्रत्येक नागरिकांना जगण्याचा मूलभूत हक्क दिला आहे. मग ती व्यक्ती कोणत्याही धर्माची, पंथाची, जातीची असो, त्यांना लोकशाहीप्रधान जीवन बहाल केले आहे.

स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळवून दिला. स्त्री आज मुख्यमंत्री, राज्यपाल, न्यायाधीश, लोकसभा अध्यक्ष, प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उच्च पदावर पोहचत आहेत. हे केवळ संविधानामुळेच होय. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे. कायद्यापुढे सर्व नागरीक समान आहेत. भारतीय राज्यघटनेचे उगमस्थान भारतीय जनताच आहे. एक व्यती, एक मत आणि एक मूल्य हे तत्व आपल्या राज्यघटनेने स्वीकारले आहे. आज जे जम्मू काश्मीर हे राज्य भारतात आहे ते फक्त भारतीय संविधानामुळे. तसेच देशातील एकात्मता कायम टिकून आहे आणि भविष्यातही टिकून राहणार ती संविधानामुळेच. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची राज्यघटना निर्मितीच्या कार्याची सुरूवात झाली. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. तर बी. एन. राव हे कायदेशीर सल्लागार होते. काँग्रेसच्या विरोधामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुंबई विधिमंडळातून म्हणजेच जैसुर आणि खुलना येथून निवडणूक लढवून जोगेंद्रनाथ मंडल आणि शेड्युल कास्ट फेडरेशनच्या सदस्यांमार्फत १७ डिसेंबर १९४६ रोजी संधिधान सभेत सदस्य म्हणून प्रवेश केला. फाळणीपूर्वीची घटना समितीची सदस्य संख्या ३८९ होती तर फाळणीनंतरची घटना समितीची सदस्य संख्या २९९ एवढी होती. घटना मसुदा समितीची घटना २९ ऑगस्ट १९४७ रोजी झाली. या मसुदा समितीमध्ये एकूण ७ सदस्य होते. या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. या मसुदा समितीचे ७ सदस्य म्हणजे अध्यक्ष : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एन. गोपाल स्वामी अय्यंगार, अल्लादी कृष्णस्वामी अय्यर, के. एम. मुन्शी, एन. माधवराव, टी. टी. कृष्णमाचारी, सईद मुहम्मद सादूला हे होते. या सदस्यांपैकी एकाने राजीनामा दिला आणि ती जागा भरली गेलीच नाही. आणि एक अन्य सभासद राज्याच्या राजकारणात गुंतून पडले त्यामुळे तेवढी पोकळी निर्माण झाली. १ किंवा २ व्यक्ती दिल्लीपासून खूप लांब होत्या व त्यांची प्रकृती त्यांना उपस्थित राहण्याची अनुमती देत नव्हती. म्हणून सरतेशेवटी असे घडले की, संविधानाचा मसूदा तयार करण्याचे उतरदायित्त्व एकट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर आले. कदाचित सभागृहाला या वास्तवाची जाणीव असावी. डॉ. बाबाहेब आंबेडकर यांनी ही जबाबदारी हे कार्य अत्यंत योग्यपणे पार पाडले. यात मला तिळमात्र शंका नाही. म्हणून आम्ही त्यांचे ऋणी आहेत, असे घटना समिती मसूदा समितीचे सदस्य टी. टी. कृष्णमाचारी यांनी म्हटले.

२५ नोव्हेंबर १९४९ रोजी घाटना समितीने मसुदा सादर केला. मसुदा घटनेची चर्चा ११ सत्रात केली गेली. संविधानसभेचे ११४ दिवस खर्च झाले. खरे पाहता घटना समितीचे कार्य एकूण १४१ दिवस चालले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना न्याय देणारी आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी राज्यघटना लिहिण्यात आली. म्हणून भारतीय राज्यघटनेच्या रूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये विशेष योगदान आहे.

संविधान सभेची स्थापना झाल्यापासून ते घटना समितीचा मसुदा सुपूर्द करीपर्यंतचा कालावधी बघितला तर २ वर्षे ११ महिने १८ दिवस म्हणजेच १,०८२ दिवस इतका कालावधी संविधान निर्मितीला लागला. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी ६३ लाख ९६ हजार ७२९ रु. ५० पैसे एवढा खर्च आला, भारतीय मूळ राज्यघटनेमध्ये एकूण कलमे ३१५, ८ परिशिष्टे व २२ विभाग आहेत. सद्यपरिस्थितीनुसार त्या कलमांमध्ये व परिशिष्टांमध्ये बदल होत आहे. सध्याची कलमे ४५९, १२ परिशिष्ट्ये व २४ विभाग आहेत. घटनेचा मसुदा संविधान सभेत सादर केल्यानंतर ४ नोव्हेंबर १९४७ते २६ नोव्हेंबर १९४९ या कालखंडात एकंदरत ७,६३५ दुरूस्त्या समितीला सुचविल्या गेल्या. परंतु त्यापैकी २,७७३ दुरूस्त्यांवर विचार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेचा सुधारित मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ रोजी घटना परिषदेला सादर केला. हा मसुदा घटना परिषदेने मंजूर करावा असा ठराव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला.

या ठरावाच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाषण केले, त्यात त्यांनी संसदीय लोकशाही आणि अध्यक्षीय पद्धतीवर आधारित लोकशाही यावर भाष्य केले. संसदीय लोकशाहीचे वेगळेपण नेमके कशात आहे अन् अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा आपली संसदीय लोकशाही कशी वेगळी असणार आहे, यावर प्रकाश टाकला आहे.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना स्वीकृत करण्यात आली आणि २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना ही राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाचा कायदा म्हणून कार्यान्वित झाली. अर्थात राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यास सुरूवात झाली. २६ जानेवारी हाच दिवस निवडण्याचे कारण असे की, २६ जानेवारी १९३० रोजी काँग्रेस पक्षाने स्वराज्यदिन म्हणून पाळल्यामुळे भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीकरीता २६ जानेवारी हा दिवस निवडण्यात आला. तथापि २६ जानेवारी १९५० पासून भारतीय गणराज्याची वाटचाल सुरू झाली आहे. मात्र, संविधानाची खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणाने अंमलबजावणी होणे ही काळाजी गरज आहे.

**-डॉ. विकास यशवंता कांबळे**
नांदेड
मो. ९०९६८०१४३४

# स्मरण २६/११ च्या शहिदांचे

२६ नोव्हेंबर २००८ मुंबईला हादरा देणारा दिवस ठरला व यांचे पडसाद भारतासह संपूर्ण जगात दिसून आले. आतंकवाद्यांच्या क्रुरतेमुळे ही भयावह घटना घडली. २६/११ ची घटना जर आपण डोळ्यासमोर आणली तर अंगावर शहारे येतात. एवढी भयावह घटना होती. त्यामुळे आजही वेदनादायी व कटु आठवणी मुंबईसह भारतीयांच्या मनात कायम आहेत.

भारतीय स्वातंत्र्यानंतर देशात अनेक आतंकवादी हल्ले झाले, परंतु २६ नोव्हेंबर २००८ हा दिवस मुंबईसह भारतासाठी काळा दिवस ठरला व आज या घटनेला १४ वर्षे पूर्ण होत आहेत. परंतु जखमा अजूनही ताज्या आहेत. कारण या भ्याड हल्ल्यात १९७ भारतीय,३४ विदेशी नागरिकांचा मृत्यू झाला तर ८०० पेक्षा अधिक लोक जखमी झाले होते. त्याचप्रमाणे आतंकवाद्यांनी एकाच वेळी एकूण १२ ठिकाणी हल्ले केले होते. यामध्ये भारतीय जवानांनी ९ आतंकवाद्यांना कंठस्नान घातले व एकट्या कसाबला जिवंत पकडण्यात यश आले व यामुळेच पाकिस्तान कट्टर आतंकवादी समर्थक देश असल्याचे जगाला भारताने दाखवून दिले. यानंतर २१ नोव्हेंबर २०१२ ला कसाबला फाशी देण्यात आली. या हल्ल्यात मुख्यत्वे करून भारतीयांसह अनेक विदेशी नागरिक सुध्दा होते त्यांचाही यात मृत्यू झाला. त्यामुळे या घटनेने संपूर्ण जग हादरले.



२६ नोव्हेंबर २००८ रोजी पाकिस्तानमधून लष्करे तोयबाचे १० आतंकवादी समुद्राच्या मार्गे दक्षिण मुंबईत घुसले होते. पाकिस्तानी आतंकवाद्यांनी मुख्यत्वे करून विदेशी नागरिक असलेल्या हॉटेलला टार्गेट केले होते. यात हॉटेल ताज, नरिमन हाऊस, होटेल ओबेरॉय, लिओपोल्ड कॅफे,सीएसएमटी, कामा रूग्णालय याशिवाय अनेक रेस्टॉरंटवर आतंकवाद्यांनी एकाच वेळी अंधाधुंद गोळीबार केला होता. अतिरेक्यांचा खात्मा करण्यासाठी सुरक्षा यंत्रणेला तब्बल तीन दिवस लागले. म्हणजेच जवळपास ६० तास दहशतवादी आणि सुरक्षा यंत्रणां-मध्ये चकमक सुरू होती. या दहशतवादी हल्ल्यात अनेक पोलिसांसह व वरिष्ठ अधिकारी शहीद झाले यात मुख्यत्वे करून हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे, संदीप उन्नीकृष्णन इत्यादींसह अनेक होते. १० दहशतवाद्यांपैकी एका दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात यश आले. हा दहशतवादी म्हणजे अजमल आमीर कसाब होय. शहीद तुकाराम ओंबळे यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता व आपल्या अंगावर अनेक गोळ्या झेलून अजमल कसाबला जिवंत पकडले.परंतु तुकाराम ओंबळे शहीद झाले. तुकाराम ओंबळे यांनी अजमल कसाबला जिवंत पकडल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानचा खरा चेहरा समोर येण्यास मदत झाली. यानंतर कसाबला २०१० मध्ये विषेश कोर्टाने दोषी ठरवून मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली.

२१ नोव्हेंबर २०१२ ला सकाळी साडेसात वाजता कसाबला पुण्यातील येरवडा कारागृहात फासावर लटकविण्यात आले व २६/११ च्या आतंकवादी कारवायांचा सरकारने शेवट केला.परंतु आजही २६/११ जखमा प्रत्येक मुंबईकरांच्या व भारतीयांच्या मनात व हृदयात कायम आहेत. २६/११ च्या हल्ल्यानंतर महाराष्ट्रासह संपूर्ण राज्ये आणि केंद्र सरकार सतर्क झाले व अशा पद्धतीच्या घटना पुन्हा उद्भवणार नाही याची काळजी घेवून देशाची संपूर्ण सुरक्षा यंत्रणा अत्याधुनिक पद्धतीने सज्ज करण्यात आली आहे. त्यामुळे आता आतंकवाद्यांची घुसखोरी किंवा कोणत्याही कारवाईला मुतोड जवाब देण्यास भारतीय सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे. त्यामुळेच आतंकवाद्यांच्या मुसक्या आवळण्यात यश येत आहे. याचे उदाहरण म्हणजे जम्मू काश्मीर-मधील आतंकवाद्यांचा होत असलेला खात्मा. जोपर्यंत सूर्य-चंद्र आहे तोपर्यंत शहिदांना कोणीही विसरणार नाही.कारण त्यांच्या पुण्याईनेच आज आपण मोकळा श्वास घेत आहोत व सुरक्षित आहोत.

२६/११ ला शहिदांना श्रद्धांजली अर्पण करतांना देशवासीयांनी लक्षात ठेवले पाहिजे की शहिदांची आठवण अनेक युगापर्यंत रहावी या करीता प्रत्येकांनी शहिदांच्या नावांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे शहिदांची आठवण दीर्घकाळ पर्यंत अवश्य राहीलच. त्याचप्रमाणे पर्यावरणाला या वृक्षाचा मोठा फायदा सुध्दा होईल. यामुळे गुरांना चारा, पशुपक्ष्यांना राहण्यास घर व सर्वत्र शुध्द हवा मिळण्यास मोठी मदत होईल. हे सर्व शहिदांच्या नावांनी लावलेल्या वृक्षांनी सफल होवु शकते. यामुळे आपल्याला झाडाच्या पानांत, फुलात, फळात,जळा-मुळात आपल्या शहिदांचे दर्शन अवश्य होईल. त्यामुळे २६/११ चे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी व अनंत काळापर्यंत शहिदांची आठवण जागृत रहावी. हीच शहिदांना खरी श्रद्धांजली राहील असे वाटते. मातृभूमीची रक्षा करणाऱ्या देशाच्या शहीद शुरविरांना कोटी-कोटी प्रणाम.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. नं.९९२१६९०७७९

# गावाकडच्या सटी (चंपाषष्ठी)

प्रत्येक गावाची आणि परिसराची विविध सणांच्या बाबतीत एक आगळी वेगळी ओळख आहे. त्यात महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात आणि परिसरात अशा भरपूर लोक परंपरा अजूनही अबाधित असून त्याद्वारे समाजात विविध सण-समारंभ संपन्न होतांना ग्रामीण संस्कृतीचा सुगंध सर्वत्र दरवळत असतो. असाच महाराष्ट्रात चंपाषष्ठीचा उत्सव मोठ्या उत्साहात विविध प्रकारे साजरा केला जातो. हा सण आमच्या गावाकडे लहानपणी मोठ्या उत्साहात साजरा केला जात असे.

आमच्या मराठवाड्यात गोजेगावाकडे चंपाषष्ठी या सणाला सटी म्हणतात. मला आजही आठवतेय की; गावाकडे हा सण दोन दिवस साजरा केला जात असे. सटीच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे षष्ठीच्या अगोदर पंचमीला माय नागदिवे करायची. पंचमीला माय आमच्या स्वतःच्या घरीच जोगवा मागायची. जोगवा मागतांना तिच्या हातातील ताटात दोन टिपर म्हणजे मोठाले ज्वारी आणि सजगुऱ्याचे (बाजरी) असे दिवे असायचे. जोगवा मागण्यापूर्वी माय आमच्यापैकी एकाला पीठ घेऊन दारात उभं करायची आणि जोगवा, जोगवा असं म्हणत पाच वेळेस आमच्याच दारात जोगवा मागायची. मग आम्ही मायला थोडं थोडं पीठ वाढायचो. मायच्या ताटातील दोन्ही नाग दिव्याच्या वातीच्या जागी दिव्याला नाक काढलेले असायचे. त्या नागदिव्याला नाकाच्या जागी कुंकू लावलेल्या वाती असायच्या आणि त्यावर हरभऱ्याच्या भाजीची पाने असायची. जोगवा मागल्यानंतर माय नाग दिव्याचा उपवास सोडायची. त्या नागदिव्यांच्या वातीवर माय पितळेचे ताट धरून ठेवायची. थोड्यावेळाने त्या पितळेच्या ताटाला काजळी यायची. बस्स, मायचे काम व्हायचे. रात्री झोपताना माय घरातील गायीच्या तुपात पितळेच्या ताटाची काजळी मिसळून काजळ करून आमच्या डोळ्यात घालायची. आम्ही झोपलेलो असतांना ते आमच्या लक्षातही यायचे नाही. दुसऱ्या दिवशी म्हणजेच सटीच्या दिवशी आम्ही आरशात पहायचो तेंव्हा आमचे डोळे काळे कुट्ट झालेले असायचे. सकाळी मोठे दादा आम्हाला काजळे बैल म्हणून चिडवायचे आणि मग माय त्यांच्यावर रागवायची. नागदिवे म्हणजे नागाची पूजा. आपण सार्वजन नागवंशीय आहोत याचे आणि निसर्ग पूजेचे हे द्योतक! म्हणजेच वर्षातून दोनदा नागपूजा व्हायची, एक नागपंचमीला आणि दुसरी नागदिव्याला! दोन्हीही काळ शेतकरी खरीप आणि रब्बी पेरणी सुरु होण्याचे, त्यामुळे नागपुजेला विशेष महत्व असायचे आणि नंतर आम्हाला साप हा शेतकऱ्याचा मित्र असतो हे विज्ञानाच्या पुस्तकात वाचायला मिळाले.

सटीचा (चंपाषष्ठी) चा सण संपूर्ण गावभर मोठ्या उत्साहात साजरा व्हायचा. आम्ही उठायच्या आत मायचं घर सारवणं आणि दारात सडा झालेला असायचा. गावातील जवळपास सर्वच घरी चार महिने म्हणजे आषाढी एकादशी नंतर येणाऱ्या पौर्णिमेपासून ते चंपाषष्ठीपर्यंत वांगे आणि कांद्याची पाथ खात नसायचे आणि आजपण आम्ही हे पाळतो. यामागे वैज्ञानिक कारण असावे. हा मंदाग्नीचा काळ आहे. या चार महिन्यात माणसाने हलके अन्न खावे. असो. अगोदरच्या दिवशीच माय-बाबा-दादा सटीची तयारी करायचे. आमच्या घरी दोन खंडी गाई आणि एक दोन कुत्रे असायचेच. सटीच्या दिवशी सकाळीच बाबांची देवपूजा झाली की तळी उचलायचा कार्यक्रम असायचा. शेजारचे पाजारचे माणसं एकमेकांच्या घरी तळी उचलायला जायचे. आमच्या घरी येटाळीतले, भावकीचे, सोयरे चार-पाचजण यायचे. देवपूजा झालेली असायची. बाबा देव्हाऱ्यासमोर खाली जमिनीवर घोंगडी अथरायचे. त्या घोंगडीवर पूजेचे ताट ठेवले जायचे. त्या ताटात गव्हाचे शिजवून केलेले पाच-सात दिवे असायचे. त्याला आरती म्हणतात. माय आरती लावून देत असे. त्यानंतर बाबा देव्हाऱ्यातील खंडोबा देवाला आरतीच्या ताटात ठेवायचे. मग सगळे चार-पाच जण डोक्यावर टोपी-रुमाल घेऊन त्या खंडोबा देव ठेवलेल्या आरतीच्या ताटाला हाय लावून ताट उचलायचे. उचलतांना हातातील भंडार अर्थात हळद खंडोबा देवावर उधळत, येळकोट येळकोट जय मल्हार! असं पाच वेळा म्हणून खंडोबा देवाची तळी उचलायचे. तळी उचलणं झाली की सर्वजण एकमेकांना भंडार लावायचे. ही परंपरा आजही आम्ही मोठ्या सन्मानाने जपतो. त्यानंतर गावभर लोक एकमेकांच्या घरी तळी उचलायला जायचे.

खंडोबा हे आमच्या पंचक्रोशीतील जवळपास सर्वच गावाचे कुलदैवत! आमच्या गावच्या उत्तरेला जो डोंगर आहे त्या माळावर जुने हेमाडपंथी खंडोबाचे स्तूपवजा मंदिर असून सटीच्या दिवशी माळावरील खंडोबाला प्रत्येक घराचा भरीत पानग्याचा नैवेद्य असतोच. एवढेच काय आमच्या शेतात सुद्धा एक खंडोबाचे मंदिर आहे. त्या खंडोबाला सुद्धा गोजेगाव, चीमेगाव, धार, माथा, भगवा इत्यादी गावातील लोक सटीला वांग्याचे भरीत-पानग्याचा (बाजरी) नैवेद्य, आरती वाहतात. पानगा म्हणजे बाजरीचा नैवेद्य. गावाकडे बाजरीला सजगुरे म्हणत असायचे आणि ते आमच्याकडे खाल्ले जात नसत. बैलाच्या खाण्यात सजगुरे टाकून दिले जायचे. हिरवे, कडसर लागल्यामुळे लहान मुले तर अजिबात बाजरी खात नसत. आमच्या माळावर आणि शेतातसुद्धा खंडोबाचे मंदिर आहे, याचा अर्थ आमचे आजोबा-पणजोबा खंडोबा देवाला मानणारे होते; म्हणूनच आमच्या बाबांचे नाव खंडुजी ठेवले असावे. अगोदरच्या काळी आपल्या घराण्याच्या परंपरा मुलाबाळांचे नावे ठेवूनच जपल्या जायच्या. माझा जन्म आषाढी एकादशीच्या द्वादशीचा, म्हणून आमच्या माय-बाबांनी माझे नाव विठ्ठल ठेवले.

तळी उचलल्यानंतर माय देवाला भरीत पानग्याचा नैवेद्य ठेवायची. मारोतीच्या पारावरचा नैवेद्य वाहून आले की; तब्बल चार महिन्यानंतर आम्हाला वांग्याचे भरीत खायला मिळायचे. चुलीतल्या खवखव आहारात भाजलेले वांगे, ते कुस्करून त्यात कांद्याची पाथ टाकून ते भरीत तव्यावर झणझणीत फोडणी दिलेले असायचे. सोबत सजगुऱ्याची (बाजरी) भाकर असायची. गावाकडच्या मायच्या हाताच्या चुलीवरच्या भरताची आठवण आली की आजही तोंडाला पाणी सुटते! एकदम चवदार जेवण झालं की; आम्ही वावरातील खंडोबाच्या नावानं बाजूला काढून ठेवलेले नैवेद्य आणि आरती घेऊन जायचो. आता दुपार झालेली असायची. वावरात बाल्या कुत्रं वाट पहाट असायचं. आम्ही पळूपळू वावरात जायचो. खंडोबा देवाला नैवद्य वाहून बाल्याला भंडार लावून पानगा खाऊ घालायचो. बाल्या माझा जिवलग मित्र होता. नुसता माझ्या अंगावर उड्या मारायचा अन मी त्याच्यावर बसून मस्त वावरात फिरायचो. पाच वाजता आम्ही अन बाल्या वावरातल्या खंडोबाच्या मंदिरात जाऊन लोकांनी देवाला वाहिलेल्या आरतीचा मस्त आस्वाद घ्यायचो. लय चवदार लागायची देवा जवळची आरती!

आज मागे वळून पाहतांना हे सर्व आठवले की; वेडे मन भूतकाळात शिरते. तेंव्हाचे वावर जांब, पपई, लिंबोणी, खारकी बोर इत्यादी झाडांनी सजलेलं असायचं. आज गावाकडे माय-बाबा नाहीत. खायला सर्वकाही आहे पण ती चव नाही. वावर जाग्यावर आहे मात्र त्याचे तुकडे झालेत. बसायला एक झाड नाही. विहिरीवर ते जुनं चाफ्याचं खोड वाट पाहत उभं आहे बाकी विहिरीच्या भोवतालची जांबाची, हदगा, पपई, लिंबोणी, बोरीची झाडे काळाच्या पडद्याआड गेलीत. मी गावाकडे जातो तेंव्हा एकटाच विहिरीवर जाऊन बसतो आणि विहिरीच्या भवतालचा परिसर आठवत असतो. आज सटी अर्थात चंपाषष्ठी असल्यामुळे ते बालपण आठवलं. तो काळ आणि त्याच्या अविस्मरणीय आठवणी सर्वकाही मनःपटलावर घोंगावत सर्रकन निघून गेल्या! मग काय करणार? आठवलं ते लिहितो. विरेचन, बस्स! येळकोट येळकोट जय मल्हार!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि.परभणी (महाराष्ट्र)
मो ९१५८०६४०६८

## थोडक्यात...

### संविधान दिन साजरा करण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय संविधानाची नागरिकांना माहिती असावी व त्यासंबंधी जनजागृती व्हावी या उद्देशाने दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून पाळण्यात येतो. जिल्ह्यातील सर्व विभाग प्रमुखांनी हा दिवस साजरा करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी नांदेड यांनी दिले आहेत.

या दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन शासकीय कार्यालये, महामंडळे, शाळा, महाविद्यालये इत्यादी ठिकाणी करण्यात यावे. तसेच वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा आयोजित कराव्यात. विद्यापीठामधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात यावे. तसेच शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी यासाठी संविधानाविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रभात फेऱ्यांचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हा प्रशासनाच्यावतीने दिले आहेत.

### इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ कार्यालयाचे स्थलांतर

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य इतर मागावर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. जिल्हा कार्यालय नांदेड हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन इमारत अ मध्ये दुसऱ्या मजल्यावर कार्यरत होते.

सदर कार्यालय हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ग्यानमाता शाळेच्या समोर, इमारत ब मध्ये दुसऱ्या मजल्यावर स्थलांतर करण्यात आलेले आहे. तरी संबंधितांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचा निर्णायक हितगुज महामेळावा उत्साहात

## नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, संभाजीनगर येथील ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेसकॉम नांदेडच्या ज्येष्ठ नागरिकांच्या निर्णायक हितगुज महामेळावा घेण्यात आला. मेळाव्यास चांगला प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात मोठ्या संख्येने गरजवंत जेष्ठ नागरिक महिला, पुरुष सहभागी झाले होते. सर्वानुमते जर शासनाने आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर आपला रोष दाखविण्यासाठी 'नॉन ऑफ द अबोअ'ला म्हणजेच नोटाला मतदान द्यायचे आहे, असे या मेळाव्यात ठरले आहे, अशी माहिती ज्येष्ठ नागरीक संघाचे डॉ. हंसराज वैद्य यांनी सांगितले.



मेळाव्यास नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, संभाजीनगर येथून गरीब गरजवंत जेष्ठ महिला–पुरुष यांनी गर्दी केली होती. संत बाबा बलविंदर सिंघजी यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने मेळाव्याची सुरुवात झाली. नांदेडचे गायक विजय बंडेवार, भजन सम्राट अण्णा तथा सोनकांबळे यांनी आपल्या सुमधुर भावगीत आणि भक्ती गितांनी सर्व मेळाव्यार्थींना खेळवून ठेवले. महामेळाव्यास डॉ.हंसराज वैद्य अध्यक्ष उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग इस्कॉन नांदेड यांनी सखोल मार्गदर्शन केले. सर्व ठराव तथा निर्णय एकमुखी अर्थात सर्वानुमते घेण्यात आले.

या मेळाव्यात शासनाने शासन निर्णयाप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांचे धोरण, २००७ चा कायदा २०१० चे नियम आणि २०१३ व २०१८ चा कायदा शासनाने त्वरित अमलात आणावा. ज्येष्ठ नागरिकांना राष्ट्रीय संपत्ती म्हणून घोषित करावी, ज्येष्ठ नागरिक हा देशाचा तथा राष्ट्राचा शिल्पकारच नव्हे तर आधारवड आहे हे शासनाने जाणा जाणावे. शासनाने लाडके जेष्ठ नागरिक मायबाप योजना राबवावी. शासनाने ज्येष्ठ नागरिकांना इतर शेजारील राज्य प्रमाणे प्रतिमा हा ५ हजार रुपये मानधन मान्य करावे. शासनाने कसलेही नियम लाऊ नये. ज्येष्ठ नागरिकांचा आरोग्य विमा शासनाने भरावा, साठ वर्षांच्यावर वय झालेल्या ज्येष्ठ नागरिकांना आता करमुक्त करावे, जेष्ठ नागरिकांना सुखकर प्रवास घडण्यासाठी आरक्षणासह विनामूल्य प्रवास करण्याची तरतूद करावी. ज्येष्ठ महिला व पुरुष यांच्या मधून विधान परिषदेवर व राज्यसभेवर घेण्याची तरतूद करावी, शासनाने ज्येष्ठ नागरिक खाते व जेष्ठ नागरिक खात्याचा मंत्री निर्मिती करून अंमलात आणावी. ज्येष्ठ नागरिकांना बिनकामाचे बेक्कार समजू नये. टाकाऊ समजू नये. एक एक ज्येष्ठ नागरिक हा सहा मताचा राजा आहे. एकूण मतदार संख्येच्या २० टक्के मतदान हा ज्येष्ठ नागरिक आहे. स्वातंत्र्यापासून ते आज टागायत सर्व सरकारी ज्येष्ठ नागरिकांनी निवडलेली आहेत. सध्याचे सरकार ही ज्येष्ठ नागरिकांच्या मतामुळे निवडले गेलेले आहे हे विसरू नये, असा इशाराही शासनाला या मेळाव्यातून देण्यात आला आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांबद्दल विधानसभेत मांडण्यात आलेल्या सुखसोयी विधेयक २०२५ क्रमांक ७२ सखोल अभ्यासून निर्णय घेण्यात यावा. येणाऱ्या हिवाळी अधिवेशनाती शासनाने निर्णय जाहीर करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# अडचणीतल्या महिलांसाठी हक्काचा शासकीय आधार

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत नांदेड शहरात माता अनुसया शासकिय महिला वसतिगृह (राज्यगृह) ही शासकीय संस्था अनाथ, निराधार, निराश्रीत व अडचणीतल्या महिलांसाठी कार्यरत आहे. येथे १८ ते ६० वर्षांपर्यंत निवाऱ्याची आवश्यकता असणाऱ्या निराधार, विधवा, कुमारी माता, परित्यक्ता, आत्याचारीत महिलांसाठी विनाशुल्क अन्न, वस्त्र, निवारा, समुपदेशन व पुर्नवसनाची व्यवस्था केली जाते. त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते.

येथे आवश्यकतेनुसार कायदेशीर सल्ला व मदत दिली जाते, तसेच नियमित आरोग्य तपासणी केली जाते. १८ वर्षापुढील महिलांना मानसिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच पुनर्वसनाच्यादृष्टिने त्यांच्या विवाहाकरीता संस्थेत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. येथे शिक्षण व प्रशिक्षण घेत असलेल्या महिलांना आवश्यकतेनुसार प्रवेश दिला जातो. समस्याग्रस्त १८ वर्षापुढील महिलांनी संकटकाळी चुकीच्या मार्गानी न जाता समस्येचे निराकरण होईपर्यंत अल्प कालावधीसाठी या संस्थेत दाखल होण्याच्या फायदा घ्यावा. प्रवेशासाठी फोटोसह ओळखपत्र आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी कामकाजाच्या दिवशी दुपारी १ ते ३ यावेळेत अधीक्षक माता अनुसया शासकिय महिला वसतिगृह (राज्यगृह), हॉटेल भाईजी पॅलेसच्या पाठीमागे शिवाजीनगर उड्डाणपुल परिसर शिवाजीनगर नांदेड येथे किंवा दुरध्वनी क्रमांक ०२४६२–२३३०४४ संपर्क साधावा, असे आवाहन नांदेड येथील शासकीय महिला राज्यगृह अधीक्षक अ.सा.ठकरोड यांनी केले आहे.

# स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता सर्वेक्षण समितीकडून नांदेड बसस्थानकाची पाहणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता सर्वेक्षण करण्यासाठी राज्यस्तरीय समितीने दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता नांदडे बसस्थानकाची पाहणी केली.

यावेळी प्रादेशिक व्यवस्थापक सौ.चेतना खीरवाडकर, प्रादेशिक अभियंता विवेक लोंढे, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर, रमाकांत घोणसीकर, विभाग नियंत्रण डॉ. चंद्रकांत वडस्कर, वाहतूक अधीक्षक तथा आगार प्रभारी मिलिंद सोनाळे, बसस्थानक प्रमुख यासीन खान, महामंडळाचे कर्मचारी बालाजी शिंदे, रब्बानी, फुलारी यांची उपस्थिती होती.

यावेळी समितीने बस स्थानकातील आगारासह संपूर्ण परिसराची स्वच्छता पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, चालक, वाहक व प्रवाश्यांसाठी दिल्या जाणाऱ्या सुविधा आदीची तपासणी केली. या तृतीय सर्वेक्षणानंतर बसस्थानक तपासणीचा अहवाल ते शासनाला सादर करणार आहेत.

# वीज चोरीचा बीमोड करणारे मिना नाटक नाट्य रसिकांनी केले हाऊसफुल

## सांस्कृतिक कार्य विभागाच्या राज्य नाट्य स्पर्धेला रसिकांचा प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजन करण्यात आलेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२५ – २०२६ च्या प्राथमिक फेरीत नांदेड केंद्रावर शिवशंभो वीज प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने प्रमोद देशमुख लिखित आणि दिग्दर्शित 'मीना' हे नाटक सादर करण्यात आले. शंकरराव चव्हाण नाट्यगृह नांदेड येथे झालेल्या या प्रयोगाला हाउसफुलचा बोर्ड लागला होता.



महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मध्ये काम करणाऱ्या लाईनमन इंजिनियर ऑपरेटर कंत्राटी कामगार अतांत्रिक कामगार वीज ग्राहक यांच्या जीवन संघर्षाची ही कहाणी अतिशय दमदार पणे सादर करण्यात आली.

महावितरणच्या कावडपूर शाखेत नव्यानेच रुजू झालेले अभियंता डोकळे हे शाखा कार्यालयाची एकूण झाडाझडती घेत कामावर क्ष द्यायला सुरुवात करतात परंतु कार्यालयात कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने त्यांना वारंवार अडचणीचा सामना करावा लागतो हे त्यांना येणाऱ्या अनेक फोन कॉल्स वरून समजते. अशातच तक्रारीवर बदली झालेला नाटकाचा नायक राजू (प्रमोद देशमुख), झोन बदलीवर आलेली नाटकाची नायिका रश्मी (स्वाती लांडगे) यांच्यामुळे तेथे काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या अस्तित्वावर घाला येतो आणि सुरवसे (निवृत्ती जाधव) हे हवालदिल होतात. एक ग्राहक आपल्या वीज बिलाची तक्रार घेऊन कार्यालयात येतात आणि त्यांना आलेल्या चुकीच्या वीजबिल्याबद्दल अभियंता यांना जाब विचारतात आणि प्रेक्षकांसमोर काही प्रश्न ठेवतात त्यात लक्ष घालण्याचे आश्वासन नाटकाचा नायक राजू त्यांना देतो आणि या त्याच्या सकारात्मक वागणुकीवर भाळून रश्मी राजू कडे आपसूकच आकर्षित होते आणि त्यांच्यात एक हळुवार प्रेम सुरू होते तर दुसऱ्या बाजूला राजूच्या येण्यामुळे सुरवसेंना निर्माण झालेला धोका सुरवसेच्या मनावर बिंबवण्यात लाईनमन जाधव (महेश स्वामी) आणि अन्नमवार (श्रीराम ढगे) जवळपास यशस्वी होतात आणि त्याची जागा राखण्यासाठी एक जागा रिकामी करावी लागेल असे सुचवतात.

महावितरण किंवा त्यांचा लाईनमन यांची एकच बाजू नेहमी समाजासमोर आली आहे परंतु त्याची दुसरी बाजू दाखवण्याचा प्रयत्न या ठिकाणी लेखक दिग्दर्शक प्रमोद देशमुख यांनी केला आहे. वीज ही राष्ट्रीय संपत्ती असेल तर मग यातलं मरण साधं कसं, आमचंही मरण राष्ट्रसाठी सीमेवर जणू शहिदाचं जसं, असं सांगून दिला का कधी आम्हाला शहिदाचा दर्जा असा प्रश्न नाटकाचा नायक राजू विचारतो. वस्तुस्थितीला धरून अतिशय रंजकपणे हा विषय दिग्दर्शकाने हाताळला आहे.

# उस्माननगर येथे दत्त प्रगट दिन सोहळा व अखंड दत्तनाम सप्ताहाचे आयेजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी उस्माननगर येथील दत्त मंदिरात श्री दत्तनाम सप्ताह, श्री १०८ कैवल्यवासी श्री गंभिरबन महंत महाराज कोलंबी व मोक्षवासी तपोनिधी श्री गुरूवर्य संत शंकरबन महाराज गुरु अमृतबन महाराज मठ संस्थान इसाद यांच्या कृपा आशीर्वादाने आयोजित केला आहे. व संत अवधुतबन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर दरम्यान मंगलमय वातावरणात उत्सव आयोजित केला.

दत्त प्रगट दिन व अखंड दत्तनाम सप्ताह सोहळयास दि. २८ डिसेंबरला प्रारंभ होईल. यावेळी महाराष्ट्रातील नामवंत विचारवंत किर्तनकार म्हणून दभप आनंदबन महाराज, दि. २९ डिसेंबर रोजी किर्तनकार म्हणून दभप चंद्रकांत महाराज लाठकर, दि. ३० डिसेंबर रोजी दभप सच्चिदानंद बन महाराज सरेगाव, दि. १ डिसेंबर रोजी किर्तनकार म्हणून शिभप वेदांताचार्य दिगंबर महाराज वसमतकर, दि. २ डिसेंबर रोजी रात्री हभप नागेश महाराज लाठकर, दि. ३ डिसेंबर रोजी रात्री किर्तनकार म्हणून दभप शामसुंदर गिरी महाराज आष्टी, श्री. श्री. १०८ महंत यदुबन महाराज यांचे आगमन व जंगी स्वागत करण्यात येईल. दि. ४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वा. दत्तप्रगट उत्सव सोहळा संपन्न होईल व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री गुरु अवधूत बन गुरू शंकरबन महाराज मठ संस्थान व समस्त गावकरी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत अनिकेत नागरगोजे, आरुषी कदम व आराध्या जगतापकडून पदकांची कमाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान वाराणसी, उत्तरप्रदेश येथे पार पडलेल्या राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत अनिकेत नागरगोजे व आरुषी कदम हिने मिश्र दुहेरी स्पर्धेत आपल्या खेळाचे उत्तम प्रदर्शन करत सिल्वर पदक प्राप्त केले. तर आराध्या जगताप हिने ब्रॉन्झ पदक प्राप्त करून नांदेड जिल्ह्याच्या लौकिकात भर टाकला आहे.



सध्या नांदेड येथील केंद्रीय विद्यालयात आठव्या वर्गात शिक्षण घेत असलेले अनिकेत, आरुषी व आराध्या हे तिघे गत दोन वर्षांपासून आंतरराष्ट्रीय खेळाडू तसेच शिवछत्रपती अवार्ड प्राप्त कोचं अमोल बोरीवाले यांच्याकडे आर्चरीचे धडे घेत आहेत. दोन वर्षांच्या काळातच त्यानी राष्ट्रीय स्पर्धेत बाजी मारली. महाराष्ट्रविरुद्ध केंद्रीय विद्यालय यांच्यातील अंतिम सामन्यातील चुरशीच्या लढतीत सिल्वर पदक प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल कोच अमोल बोरिवाले, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा शिक्षक दीपककुमार, यांच्यासह मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्रा फर्स्ट इंटर स्कूल कॉम्पिटिशनमध्ये राजर्षी शाहू विद्यालयाचे यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रा फर्स्ट इंटर स्कूल कॉम्पिटिशन क्रीडा स्पर्धा सायन्स कॉलेजच्या मैदानावर संपन्न झाल्या. सदरील स्पर्धेत राजर्षी शाहू विद्यालय, वसंतनगर नांदेडच्या दुपार सत्रातील प्रेम कदम या विद्यार्थ्याने ८०० मीटर रनिंग स्पर्धेत, तर कु. सौम्या राठोड, कु. संजिवनी भवर आणि कृष्णा कदम या विद्यार्थ्यांनी टेनिकॉईट स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदके मिळवली.



तसेच कु. अनुष्का हंगरगे, अंबादास शिंदे, कृष्णा जाधव, जान्हवी ठाकूर, संस्कृती शिंदे, प्राची पतंगे या विद्यार्थ्यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. ओम बोंबीलवार या विद्यार्थ्याने ४०० मीटर रनिंगमध्ये पदाकची कमाई केली. लोकमत महागेम स्पर्धेत इयत्ता ६ वीचा विद्यार्थी आदित्य गायकवाड याने १०० मीटर जलतरण स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. सदरील विद्यार्थ्यांचा प्रार्थनेच्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष तिवडे यांनी सुवर्ण, ब्राँझ आणि सिल्वर मेडल देऊन सत्कार केला व त्यांच्या क्रीडा कर्तृत्वाचा गौरव केला. क्रीडा व्यवस्थापक म्हणून रत्नाकर कोत्तापल्ले, राजू पवार यांनी काम पाहिले. यावेळी शाळेच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती निर्मला खुळे व डॉ. माणिक गाडेकर उपस्थित होते. याबद्दल यशस्वी खेळाडूंचे कौतुक शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

# नरसीत श्री खंडोबा देवाचा २७ वा महोत्सव २७ नोव्हेंबरला

**नायगाव (प्रतिनिधी)–** भगतांच्या अत्यंत श्रद्धास्थानी असलेल्या नरसी येथील श्री जागृत खंडोबा देवाचा २७ वा वार्षिक महोत्सव दि. २७ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडणार आहे. भाविकांना मंत्रमुग्ध करणारा हा सोहळा भक्ति, परंपरा आणि उत्साहाचा अनोखा संगम ठरणार असल्याचे पांडुरंग गणपती महाराज पाटे यांनी सांगितले.



दुपारी ठीक १ वाजता मल्हारनगर येथून श्री खंडोबा देवाची पालखी व वाघे वारूंची पारंपरिक मिरवणूक श्री गणपती मल्हारी महाराज पाटे यांच्या घरून सुरु होईल. जुन्या गावातील मुख्य रस्त्यांनी फिरत ही मिरवणूक नरसी चौक गाजवत श्री जागृत खंडोबा मंदिरात दाखल होणार आहे. आणि जयमल्हारच्या घोषात होणारी ही मिरवणूक पाहण्यासाठी भाविकांची गर्दी उसळण्याची शक्यता आहे.


मंदिरात आगमनानंतर श्री खंडोबा देवाचा अभिषेक सोहळा अत्यंत विधीवत पार पडणार असून, भक्तजनांसाठी हा सोहळा वर्षभराची अध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे. यानंतर सायंकाळी ५ वाजता महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. रात्री ८ ते पहाटे ५ या वेळेत आयोजित जागरण कार्यक्रमात शंकरनगरचे कीर्तनकार बळीराम महाराज सूर्यवंशी व त्यांचा संच यांचा भावस्पर्शी कीर्तनाचा नजराणा लाभणार आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील सर्व वाघे मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग या जागरणात रंगत आणणार आहे.

या महोत्सवासाठी माजी जि. प. सदस्य माणिकराव लोहगावे, अध्यक्ष माधवराव मेकाले, माजी सरपंच व्यंकटराव कोकणे, बाबाराव महाराज पाटे, व्यंकटी महाराज पाटे, गंगाधरराव वडगावे, पत्रकार गोविंद टोकलवाड नरसीकर, माधव वडजे, मारोतराव वडगावे, दत्ता भरपुरे, हानमंतराव कोकणे, किशनराव खनपटे, मारोती मांजरमे, भास्कर कोकणे, दत्ता गागलेगावे, पांडुरंग बागडे, हानमंतराव मिसे, मालु खनपटे, शिवाजी नारे, श्यामसुंदर कोकणे, संग्राम मुगावे, दत्ता गागलेगावे, परमेश्वर लोहगावे, अंकुश खनपटे, पांडुरंग खनपटे, किशोर जानोरे, आदींचा समितीत सक्रिय सहभाग असून तयारीला आता वेग आला आहे.

महोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येताच नरसी परिसरात भक्तिभावाचे वातावरण अधिक दाट झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो भाविकांनी दर्शनासाठी ओसंडून येण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

# तुप्पा येथे मुर्ती स्थापना वर्धापन, अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन सोहळा उत्साहात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** श्री हनुमान मंदिर, संत ज्ञानेश्वरी संजिवनी समाधी सोहळा निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व श्रीहरी कीर्तन मौजे तुप्पा येथे १७ ते २४ नोव्हेंबरपर्यंत आयोजित करण्यात आला होता. यावेळी भागवत कथाकार हभप विश्वनाथ महाराज कांकाडीकर यांच्या काल्याचा किर्तनाने सप्ताहाची सांगता करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील अनेक गावांतील महिला भाविक भक्त यांच्यासह ग्रामस्थांनी महाप्रसाद लाभ घेतला.





श्री हनुमान मंदिर तुप्पा येथे मुर्ती स्थापने चा ९ वा वर्धापनदिन सोहळा निमित्ताने प्रेरणास्थान वै. मामासाहेब मारतळेकर, हभप आंनदबन गुरू गंभीरबन मंहत, शिभप सांब शिवाचार्य महाराज, वैदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज, हभप भाऊसाहेब महाराज, हभप विश्वनाथ महाराज, हभप कै. माणिक महाराज, व प्रेरणास्थान किशन महाराज बरडेकर यांच्या आशिर्वादाने श्री संत ज्ञानेश्वरी संजिवनी समाधी सोहळ्यानिमित्य अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण, किर्तन सोळा असे विविध कार्यक्रम पार पडले. यावेळी काकांडा प्रमुख हभप शिवाजी मुंडकर, बालाजी भिमराव पाटील कदम, भास्कर कदम, तर तुकाराम चरित्र वाचक हभप आनंदराव पाटील इंगळे राहेगावकर व राम पाटील कांकाडीकर यांनी केले.

दि. २४ नोव्हेंबर हभप विश्वनाथ महाराज कांकाडीकर यांच्या काल्याचे किर्तनाने व महाप्रसादाने सांगता झाली. अखंड हरिनाम सप्ताहामध्ये गावातील अन्नदाते शिवहार भालेराव, रामचंद्र पाटील कदम, गणेश भालेराव, माधव पाटील कल्याणकर, सुदाम पाटील कदम, श्रीराम पाटील कदम, विठ्ठल पाटील कदम, रोहिदास कदम, रावसाहेब कदम, गंगाधर नरवाडे, अशोक कदम, साहेबराव कदम, पंडीत पाटील कदम, महाजन कदम, प्रमोद नागोरी यांनी सहकार्य केले आहे. तर सप्ताह सांगता सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, बालाजी पाटील भायेगावकर, माजी पंचायत समिती सदस्य गंगाधर नरवाडे, मारोती तळणे, सरपंच सौ.मंदाकिनी यन्नावार, उपसरपंच प्रतिनिधी दत्ता पाटील कदम, महाजन पाटील, विलायात कदम, देवराव टिपरसे, गुलाब कदम, श्रीराम पाटील, गजानन कदम यांची उपस्थिती होती.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# उलटे चला!

## डॉक्टरांचा सल्ला तुम्हाला गोंधळवून टाकेल; उलट चालण्याने गंभीर आजारांचा धोका कमी

**चालणे हा शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी सर्वात प्रभावी आणि सोपा व्यायाम आहे. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की सरळ पुढे चालण्याऐवजी मागे चालण्यानेही अनेक फायदे होतात? हो, उलट चालण्याचा आपल्या शरीरावर आणि मनावर सकारात्मक परिणाम होतो. शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे की मागे चालण्याने वजन कमी होण्यास मदत होते. ते आपले स्नायू सक्रिय करते आणि आपले संतुलन सुधारते. पुढे चालण्याऐवजी मागे चालण्याने आपली मानसिक एकाग्रता वाढते आणि आपली कार्यक्षमता सुधारते. चिंता, नैराश्य आणि तणावाने ग्रस्त असलेल्या लोकांनी नक्कीच उलट चालण्याचा प्रयत्न करावा. गुडघे आणि पाठदुखीने ग्रस्त असलेल्यांना या वेदनेपासून आराम मिळू शकतो.**



- हृदयाचे आरोग्य सुधारते : उलट चालणे हा एक उत्कृष्ट कार्डिओ व्यायाम आहे. तो आपल्या हृदयाच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. तो हृदयाच्या स्नायूंना बळकटी देतो आणि रक्त प्रवाह सुधारतो. रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी देखील हे फायदेशीर आहे. उलट चालणे वजन नियंत्रित



करण्यास देखील मदत करते. ते आपल्या शरीराची कॅलरी बर्न करण्याची क्षमता सुधारते. नियमित उलट चालणे ऑक्सिजन परिसंचरण सुधारते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.
- स्थिरता आणि संतुलन सुधारते : लोकांना सामान्यतः पुढे चालण्याची सवय असते, परंतु जेव्हा तुम्ही मागे चालता तेव्हा तुमचे शरीर संतुलन राखण्यास शिकते. उलट चालणे स्नायूंचा प्रतिसाद वाढवते आणि वृद्ध लोकांमध्ये पडण्याचा धोका कमी करते. उलट चालणे स्नायूंचे नियंत्रण सुधारते आणि संपूर्ण शरीरात समन्वय आणि संतुलन सुधारते.
- मानसिक क्षमता सुधारते : उलट चालणे आपले मन सक्रिय करते, ते अधिक सतर्क करते. यामुळे विचार करण्याची आणि समजून घेण्याची आपली क्षमता सुधारते. जेव्हा आपण मागे चालतो तेव्हा आपले मन संतुलित आणि सतर्क होते, ज्यामुळे मेंदूची एकाग्रता वाढते. यामुळे न्यूरोलॉजिकल आरोग्य सुधारते आणि डिमेंशियासारख्या वयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. उलट चालणे मानसिक आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. यामुळे नैराश्य आणि तणाव यासारख्या समस्या देखील कमी होतात.
- वजन कमी करण्यास मदत : पुढे चालण्यापेक्षा मागे चालणे अधिक प्रभावी आहे. उलट चालण्यामुळे शरीरातील स्नायू, जसे की नितंब आणि स्नायूंचा वापर करून जास्त कॅलरीज बर्न होतात. यामुळे आपले चयापचय सुधारते आणि चरबी जाळण्यास देखील मदत होते. नियमित उलट चालण्यामुळे आपले स्नायू मजबूत होतात आणि वजन कमी होण्यास देखील मदत होते.
- मानसिक आरोग्य सुधारते : उलट चालण्यामुळे आपले मानसिक आरोग्य सुधारते. नैराश्य किंवा तणावाच्या वेळी ते आपल्याला आराम देते. उलट चालण्यामुळे आपल्या शरीरात एंडोर्फिन हार्मोन रिलीज होतात. जे मूड सुधारतात आणि चिंता, ताण आणि नैराश्यासारख्या समस्या कमी करतात. हे आपल्या शरीरात उर्जेची पातळी वाढवते, ज्यामुळे आपण कोणतेही काम उर्जेने करू शकतो. मन अधिक कार्यक्षम करण्यासाठी उलट चालणे आवश्यक आहे.
- स्नायू आणि सांधे मजबूत : उलट चालण्यामुळे आपल्या पायांचे स्नायू मजबूत होतात. यामुळे आपल्या सांधे आणि गुडघ्यांवर दबाव देखील कमी होतो. संधिवात किंवा सांधेदुखीने ग्रस्त असलेल्यांना उलट चालण्यामुळे लक्षणीय आराम मिळतो. उलट चालण्यामुळे नितंब आणि स्नायूंची ताकद वाढते. कोणत्याही दुखापतीतून लवकर बरे होण्यास देखील मदत होते.





## कॉफीने पडू शकता आजारी!

कापणी, साठवणूक आणि वाहतूक करताना कॉफीमध्ये थोडासा ओलावा देखील बुरशीच्या वाढीस प्रोत्साहन देतो. हे विविध बुरशींसाठी प्रजनन भूमी बनते. जे विषारी पदार्थ सोडतात आणि यकृत, मूत्रपिंड आणि इतर अवयवांना नुकसान पोहोचवतात. याचा सर्वात वाईट परिणाम कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्यांवर होतो. हे धोके टाळण्यासाठी तुम्ही डिफेक कॉफी, इन्स्टंट कॉफी आणि कमर्शियल कॉफी खरेदी करणे टाळावे. कारण ते बुरशीचे आश्रयस्थान म्हणून ओळखले जातात. त्याऐवजी, उच्च दर्जाचे कॉफी ब्रँड निवडा. तुमची कॉफी नेहमी कोरड्या, थंड जागी हवाबंद कंटेनरमध्ये साठवा. कॉफी भाजून आणि योग्यरित्या तयार केली आहे याची खात्री करा. कारण यामुळे मायकोटॉक्सिनची पातळी अंदाजे ४० ते ६५ टक्के कमी होते.

# डोळ्यांत जळजळ, वेदना अन् धूसरपणा?



## डॉक्टरांनी सांगितले प्रदूषणापासून वाचण्याचे उपाय, नजर होईल तीक्ष्ण

**सध्या प्रदूषण सर्व रेकॉर्ड तोडत आहे आणि हवेचा दर्जा निर्देशांक बिघडत आहे. ही परिस्थिती तुमच्या फुफ्फुसांसाठी आणि हृदयासाठी, विशेषतः वृद्धांसाठी आणि मुलांसाठी खूप धोकादायक ठरू शकते. पण आणखी एक अवयव आहे ज्याला धूळ प्रदूषण हानी पोहोचवत आहे.**

विविध संशोधनातून असे दिसून आले आहे की पॉर्टिक्यूलेट मॅटर (पीएम) डोळ्यांना नुकसान करतात. डॉक्टरांनी स्पष्ट केले की पीएम २.५ आणि पीएम १० डोळ्यांतील अश्रूंच्या थरावर लक्षणीय परिणाम करू शकतात. ज्यामुळे जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण वाढतो. यामुळे डोळे कोरडे पडणे, ब्लेफेरायटीस आणि डोळ्यांच्या बुबुळाच्या पुढील भागाचा होणारा दाह होऊ शकतो, ज्यामुळे जळजळ, लालसरपणा आणि दृष्टी अंधुक होऊ शकते.

### डोळ्यांचे रक्षणासाठी पावले

- संरक्षणात्मक चष्मा वापरणे हे पहिले पाऊल आहे. सर्वोत्तम फ्रेम्स शोधण्यासाठी डोळ्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या, जो तुम्हाला सर्वोत्तम संरक्षणात्मक फ्रेम्सबद्दल सल्ला देऊ शकेल. कॉन्टॅक्ट लेन्स घालणाऱ्यांनी उच्च AQI मध्ये चष्मा वापरावा.
- दुसरा उपाय म्हणजे डोळ्यांना ल्यूब्रिकेट करणे. प्रदूषणामुळे अश्रूंच्या थराच्या नुकसान पोहोचते. यामुळे हायपरऑस्मोलॅरिटी होऊ शकते, ज्यामुळे अश्रूंमध्ये मीठ आणि विषारी पदार्थ वाढू शकतात. हे पदार्थ काढून टाकण्यासाठी प्रिझर्व्हेटिव्ह-फ्री ल्यूब्रिकेंट वापरा.
- दूषित घटक पापण्यांवर आणि डोळ्यांभोवतीच्या त्वचेवर स्थिर होऊ शकतात. ते काढून टाकण्यासाठी, स्वच्छ पाण्याने आणि सौम्य क्लींजरने तुमचा चेहरा स्वच्छ करा. त्यानंतर तुमच्या पापण्या हळूवारपणे पुसून टाका. तसेच, डोळे घासणे टाळा. तुमचे हात स्वच्छ ठेवा.



### खिडक्या, दरवाजे उघडे ठेवू नका

जर तुम्ही उच्च AQI झोनमध्ये राहत असाल, तर तुमचे डॉक्टर सकाळी आणि संध्याकाळी उशिरा खिडक्या आणि दरवाजे उघडण्याविरुद्ध सल्ला देऊ शकतात, कारण या काळात धूळ कमी असते. घरातील आर्द्रता राखण्यासाठी आणि डोळे कोरडे पडू नयेत म्हणून घरामध्ये ह्युमिडिफायर वापरा.

### ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स

प्रदूषणामुळे होणारा ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यासाठी ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स घ्या. डोळ्यांच्या काळजीसाठी हे आवश्यक आहे. हे फॅटी ॲसिड मेबोमियन ग्रंथींचे कार्य सुधारते, जे अश्रूंच्या थराचा तेलाचा थर स्राव करतात.

# हात-पाय सुन्न, नसा कमकुवत?

**कधी कधी एकाच स्थितीत जास्त वेळ बसल्यानंतर किंवा झोपल्यानंतर तुमचे हात आणि पाय सुन्न होतात. तुमच्या हात आणि पायांमध्ये मुंग्या येणे किंवा सुन्न होणे हे अशक्तपणा आणि पौष्टिक कमतरता असल्याचे दर्शवते. जर त्वरित उपाय केले नाहीत तर ते गंभीर न्यूरोपॅथीला कारणीभूत ठरू शकते. मज्जातंतूंची कमजोरी ही एकेकाळी फक्त वृद्धांमध्ये दिसून येणारी समस्या होती, परंतु आजकाल प्रदूषण, असंतुलित जीवनशैली, पोषणाचा अभाव, ताण, मधुमेह आणि एकाच स्थितीत जास्त वेळ बसून राहिल्याने सर्व वयोगटातील लोक या समस्येने ग्रस्त आहेत.**

## डॉक्टरांनी सांगितले 3 व्हिटॅमिन, जे ठीक करतील न्यूरोपॅथी

डॉक्टरांच्या मते हात- पायांमध्ये सुन्नपणा, नसा कमजोर होणे, जळजळ होणे किंवा मुंग्या येणे ही सर्व न्यूरोपॅथीची लक्षणे आहेत. न्यूरोपॅथीचे उपचार फक्त मूळ कारण ओळखून आणि शरीराला आवश्यक पोषक तत्वे देऊन केले जाऊ शकतात. जे नसा रिचार्ज आणि मजबूत करू शकतात. डॉक्टर म्हणतात की आपल्या शरीरात काही आवश्यक खनिजे, जीवनसत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे नसांसाठी इंधन म्हणून काम करतात. त्यांना इंचार्ज न्यूट्रिएंट्स देखील म्हणतात. ते आपल्या नसांना रिकवर, रिपेअर करण्यासोबतच सेंसिटिविटी परत आणण्यासाठी आवश्यक आहेत. यामुळे हात- पायांमधील सुन्नपणापासून आराम मिळतो. जर तुमचे हातपाय अनेकदा सुन्न होतात किंवा चालताना तुमचे संतुलन बिघडत असेल, तर तुमचे शरीर तुम्हाला काही आवश्यक पोषक तत्वांची कमतरता असल्याचे सांगत आहे.



### व्हिटॅमिन बी १ ऊर्जा पुरवठादार



आपल्या नसांना योग्यरित्या कार्य करण्यासाठी सतत उर्जेची आवश्यकता असते. व्हिटॅमिन बी १ आपल्या नसांना ऊर्जा पुरवतो. शरीरात याची कमतरता निर्माण झाल्यास आपल्या नसा हळूहळू कमकुवत होतात. ज्यामुळे पायांमध्ये वेदना किंवा जळजळ होते. व्हिटॅमिन बी १ आपल्या नसांसाठी इंधन म्हणून काम करते. जर ते नसांमध्ये योग्य प्रमाणात नसेल तर हात आणि पायांमध्ये सुन्नपणा दिसून येतो. व्हिटॅमिन बी १ मिळविण्यासाठी सूर्यफुलाच्या बिया, शेंगदाणे, तपकिरी तांदूळ, राजमा, मसूर इत्यादींचे सेवन करा.

- ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स वाढवतात लुब्रिकेशन : ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स आपल्या नसांसाठी नॅचुरल लुब्रिकेशन म्हणून काम करतात. जर नसांमध्ये सूज, वेदना किंवा जडपणा असेल तर, ओमेगा ३ समृद्ध अन्न खाल्ल्याने या समस्यांपासून आराम मिळतो. ओमेगा ३ फॅटी ॲसिड्सचे सेवन केल्याने नसाभोवतीचा थर मजबूत होतो, सिग्नल ट्रान्समिशन सुधारते.
- नसा दुरुस्तीसाठी फॉलिक ॲसिड आवश्यक : फॉलिक ॲसिड शरीरात न्यूरॉन्स तयार करण्यास मदत करते. रक्त आणि ऑक्सिजन नसांपर्यंत पोहोचवण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावते. शरीरात फॉलिक ॲसिडची कमतरता असल्यास नसांना पुरवले जाणारे पोषक घटक कमी होतात आणि नसा हळूहळू कमकुवत होतात, ज्यामुळे मुंग्या येणे, बधीर होणे किंवा अशक्तपणा अशी लक्षणे दिसतात. फॉलिक ॲसिड मिळविण्यासाठी तुम्ही बीट, ब्रोकोली, हिरव्या पालेभाज्या आणि लिंबूवर्गीय फळे खाऊ शकता.
- मॅग्नेशियम देते नसांना आराम : आपल्या नसांना आराम देण्यासाठी काही खनिजे आवश्यक आहेत. मॅग्नेशियमच्या कमतरतेमुळे पायांमध्ये पेटके, ताण आणि कडकपणा वाढू शकतो. ज्यामुळे नसांवर दबाव येतो आणि न्यूरोपॅथीची लक्षणे उद्भवतात. डॉक्टरांच्या मते, नसांमधील ताण आणि पेटके शांत करण्यात मॅग्नेशियम महत्त्वाची भूमिका बजावते. मॅग्नेशियमसाठी, तपकिरी तांदूळ, पालक, बदाम, दही, केळी आणि भोपळ्याच्या बिया खा.

### व्हिटॅमिन बी १२ करते नसांना रिचार्ज

व्हिटॅमिन बी १२ हे आपल्या नसांसाठी सर्वात आवश्यक पोषक तत्व आहे. आपल्या नसांना सुरक्षा कवच निर्माण करण्यासाठी मायलिन शीथ नावाचा पदार्थ आवश्यक असतो. व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता असल्यास शरीरात मायलिन शीथचे उत्पादन कमी होते. जेव्हा नसांचा हा थर कमकुवत होतो तेव्हा हात- पायांमध्ये सुन्नपणा, मुंग्या येणे किंवा कमकुवतपणा येतो. चीज, मासे, अंडी, दही, दूध, चिकन आणि इतर पदार्थांचे सेवन केले पाहिजे.

### सिग्नलिंगसाठी व्हिटॅमिन बी ६

नसांमध्ये फुल डेवलप्ड मेसेजिंग सिस्टम काम करते. ज्यामुळे ते एकमेकांना सिग्नल पाठवू शकतात. या मेसेजिंग सिस्टिमला सुरळीत चालण्यासाठी व्हिटॅमिन बी ६ आवश्यक आहे. बी ६ च्या कमतरतेमुळे कधीकधी चालताना संतुलन बिघडू शकते किंवा हात- पाय जड वाटू शकतात. व्हिटॅमिन बी६ ची कमतरता आणि त्याचे जास्त प्रमाण दोन्ही हानिकारक आहेत. व्हिटॅमिन बी ६ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी बटाटे, पालक, केळी, शेंगदाणे आणि मसूर यांचे सेवन केले पाहिजे.

# माजी आमदार निर्मला गावित यांना वाहनाची धडक; गंभीर जखमी



**नाशिक :** माजी आमदार निर्मला गावित यांना काल सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात गंभीर दुखापत झाली असून सध्या त्यांच्यावर नाशिक येथील एका खासगी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. आपल्या नातवाला फिरवण्यासाठी बाहेर पडलेल्या निर्मला गावित यांना मागून आलेल्या चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अपघाताचा थरारक व्हिडिओ आज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर सर्वत्र खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निर्मला गावित या आपल्या नातवाला फिरवत रस्त्याच्याकडेने जात होत्या. त्याचवेळी भरधाव वेगाने आलेल्या एका चारचाकी वाहनाने त्यांच्या मागून धडक दिली. धडकेचा जोर इतका भीषण होता की त्या रस्त्यावर कोसळल्या आणि गंभीर जखमी झाल्या. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तात्काळ धाव घेत त्यांना मदतीसाठी उचलून प्राथमिक उपचार दिले आणि रुग्णवाहिकेद्वारे नाशिकच्या खासगी रुग्णालयात दाखल केले.

रुग्णालय प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, निर्मला गावित यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर मार लागला असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांची एक विशेष टीम त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे.

# डीआरएम प्रदीप कामले यांनी मानवत रोड, सेलू. परतूर, रोटेगाव, नगरसोल दरम्यान केली विकासकामांची पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी विशेष निरीक्षण दौऱ्यात मानवत रोड, सेलु, परतूर, रोटेगाव आणि नागरसोल या स्थानकांवरील अमृत स्टेशन अंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची मंगळवार दिनांक २५ नोव्हेंबर रोजी पाहणी केली.

दौर्यात स्टेशन उन्नयन, प्रवाशी सुविधा वाढविणे, स्वच्छता, सर्क्युलेशन एरिया, वेटिंग हॉल, प्लॅटफॉर्म सुधारणा तसेच मूलभूत सुविधांवरील प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

मानवत रोड सेलू परतूर रोटेगाव नागरसोल या अमृत स्टेशन स्थानकांवरील कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सुरु असलेल्या विकास कार्याचा आढावा घेण्यात आला. संबंधीत अधिकारी यांना उपयुक्त सूचना देण्यात आल्या.

तसेच या दौऱ्यात परभणी नगरसोल दरम्यान रिअर विंडो इन्स्पेक्शन करण्यात आले. ज्यात श्री कामले यांनी परभणी नगरसोल दरम्यान असलेल्या विविध रेल्वे फाटक, सिग्नल पोस्ट, रेल्वे पटरी तसेच इतर सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाच्या संसाधनांची पाहणी केली.

नागरसोल तारूर स्थानकांदरम्यान किमी ३१/१५३२/१ वरील रेल्वे फाटक क्रमांक –१३ ऐवजी रेल्वे भुयारी पुलाचे बांधकाम सुरु आहे, या रेल्वे कार्याची त्यांनी पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात श्री कामले यांच्या सोबत अभियांत्रिकी विभागाचे, परिचालन विभागाचे, विद्युत विभागाचे, तसेच वाणिज्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**प्रवाशांना आवाहन**

प्रवाशांनी रेल्वे परिसरात सुरक्षा नियमांचे पालन करावे, अनधिकृत मार्गाने ट्रॅक ओलांडू नये. विनातिकीट प्रवास करू नये, रेल्वे प्रशासनाकडून उभारल्या जाणाऱ्या सुविधा व विकासकामांसाठी नागरिकांचे सहकार्य महत्त्वाचे आहे.

## Change in Name

MyOldNameisDATTATRAYSHESHERAO INGALE which now I am changing as New Name DATTATRAYA SHESHARAO INGLE Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address: SAMARTH NIWAS SANKET NAGAR BHAVSAR CHOWK NANDED-7502637777

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभाग, यांचे कार्यालय, मुख्य इमारत.
पि.बी.एक्स : 02462 : 234710, 234577, 234404 फॅक्स : 02462-232071, E-Mail: nwmccorporation1@yahoo.in

जा.क्र.नांवाशमनपा/पापूवजनि/ 11370 /२०२५ दिनांक :- 25 NOV 2025

"जाहीर प्रगटन"

नांदेड शहरातील काळेश्वर पंपगृह ते सिडको जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत जाणाऱ्या ४५० मीमी व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला गळती झाली असून सदरील गळती तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे दिनांक २७.११.२०२५ रोजी सिडको जलशुध्दीकरण केंद्र बंद राहणार आहे. त्यामुळे सिडको,हडको,रहिमपुर व भिमवाडी या भागाचा होणारा पाणी पुरवठा दोन दिवस उशीराने होईल, याची नागरिकांनी नोंद घ्यावी व पाण्याचा वापर काटकसरीने करुन नांदेड वाघाळा महापालिकेस सहकार्य करावे. ही विनंती.

(!! पाणी हेच जीवन आहे त्याचा योग्य वापर करुन पाण्याचा अपव्यय टाळावा !!)

अतिरिक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार शिलन पि. गणपतराव सोनकांबळे रा. एन.डी-१ प्लॉट क्र.४१ उस्मानगर रोड, पाण्याच्या टॉकी जवळ, सिडको, नविन नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी हे जाहीर प्रगटन खालील प्रमाणे देत आहे.

हे की, माझे पक्षकाराचे मालकी व ताब्यातील एक प्लॉट ज्याचे क्षेत्रफळ २६० चौ.मीटर आहे व त्यावर विटाचे बांधकाम आहे. सदरचा प्लॉट हा क्र.४१ चा असुन तो सिडको भागातील आहे. माझे पक्षकार व विकास पि. मोहनराव अडाव रा. बोरगाव ता.लोहा या दोघांच्या मालकी मध्ये आहे. हे की, माझे पक्षकार यांची सोडुन दिलेली पत्नी पुष्पा पि. उत्तमराव परतवाघ रा. विलोळी नाशिक येथे सध्या राहत असुन मागील २० वर्षा पासुन माझे पक्षकारा पासुन तुझी माझ् फारकत झाली असे म्हणुन नाशिक येथे दुसरे कोणा सोबत तरी राहत आहे व नांदत आहे. माझे पक्षकारास तिच्या पासुन १. समता, २. एकता, ३. नवीन, ४, अंजु अशी आपत्य झालेली असुन माझे पक्षकारांनी प्लॉट विक्रीचा करार करुन पैसे उचलले व तीन्ही आपत्यांचे सन्मानपूर्वक विवाह करुन दिलेले आहेत. हे की, सदरील पुष्पा परतवाघ हिला सोडुन दिल्या पासुन माझे पक्षकाराने इंदुबाई नावाच्या महिलेशी दुसरा विवाह केलेला आहे व माझे पक्षकारा पासुन तिला संजीवनी व त्रिरत्नकुमार अशी आपत्य झालेली असुन ती सध्या १२ व १० वर्षाचे आहेत व माझे पक्षकार या पत्नी व मुला बाळासह एकत्रितपणे सदरील सिडको येथील घरात राहत आहेत.

हे की, सदरचे घर हे माझे पक्षकाराची स्वकष्टार्जित मालमत्ता आहे, या मालमत्तेवर इंदुबाई व तिच्या दोन आपत्यांचाच अधिकार असणार आहे. सदरची मालमत्ता ही माझे पक्षकार कर्ज फेडीसाठी कोणास तरी विक्री करणार आहेत, त्यांच्या व्यवहारात कोणालाही इतर वारसांना अडथळा किंवा हस्तक्षेप किंवा उजरदारी करण्याचा अधिकार नाही, परंतु काही हितशत्रु पुष्पा परतवाघ व तिच्या मुलांना प्रेरित करुन माझ्या पक्षकारास जिवंत मारण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझे पक्षकारांनी या बाबतीत पो. स्टे. सिडको येथे तक्रारी अर्ज दाखल केलेला आहे. हे की, सर्व संबंधितांना व जनतेला या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकाराची सोडुन दिलेली पत्नी नामे पुष्पा भ्र. शिलन सोनकांबळे हे नांव सांगुन किंवा तिच्या मुलांना भांडणास प्रवृत्त करुन माझे पक्षकाराच्या व्यवहारात अडथळा निर्माण करण्याचे प्रयत्न जयसिंग पि. ग्यानोबा ढवळे व सुजाता पि.भारत गायकवाड ही जयसिंग ढवळेची मुलगी असुन पुष्पा हिस प्रवृत्त करीत आहेत या कोणालाही माझे पक्षकाराच्या व्यवहारात व माझे पक्षकाराचे मालमत्ते संबंधाने काही एक अधिकार, संबंध व कोणतेही नाते गोते नाही, तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी. करिता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड. एम. एन. शिंगे,
गणेशनगर रोड, क्रांतीनगर, नांदेड

जाहीर प्रगटन देणार
शिलन पि. गणपतराव सोनकांबळे
रा. सिडको, एनडी-१,
प्लॉट क्र.४१ सिडको, नवीन नांदेड

## Change in Name

My Old Name is Aditi Babu Salave which now I am changing as New Name Aditi Baburao Salave Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. Sign By: Aditi Baburao Salave Current Syne By: H. No. 1-7-789, Samata Nagar, Pavdewadi Naka, Nanded -431602 Permanent Address: H. No 1-7-789, Samata Nagar, Pavdewadi Naka ,Nanded -431602
Mo. 9146618826

## Change in Name

My old Name is SHAHISTA MAKSUDALI KHAN PATHAN Which now I am Changing as New Name SHAISTA PARVEEN MAKSUDALIKHAN PATHAN Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same. Sign By-SHAISTA PARVEEN MAKSUDALIKHAN PATHAN-443, TELI GALLI TAMSA HADGAON NANDED MAHARASHTRA-431713
Mo. 9421850264


## Change in Name

My old Name is SHAHISTA MAKSUDALI KHAN PATHAN Which now I am Changing as New Name SHAISTA PARVEEN MAKSUDALIKHAN PATHAN Hence, forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same. Sign By-SHAISTA PARVEEN MAKSUDALIKHAN PATHAN-443, TELI GALLI TAMSA HADGAON NANDED MAHARASHTRA-431713
Mo. 9421850264


तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ, चिखलवाडी, नांदेड

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री दत्तराम बालाजीराव मस्के वय ४१ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड मो. नं. ९८२३०८५७५१ यांनी या कार्यालयात त्यांची मुलगी अंजली दत्तराम मस्केचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव- अंजली दत्तराम मस्के वय १५ वर्षे, रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड. सदर व्यक्तीचा राहते घर बाभुळगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ०८.०५.२०१० या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

तरी वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ, चिखलवाडी, नांदेड

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री संतोष शेषेराव मस्के वय ४६ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड मो. नं. ९७६६६६२४१० यांनी या कार्यालयात त्यांचे मुलगा अभय संतोष मस्केचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव अभय संतोष मस्के वय १४ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड सदर व्यक्तीचा राहते घर बाभुळगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ०५.०९.२०११ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

तरी वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ, चिखलवाडी, नांदेड

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार संजीवनी पुंडलिक मस्के वय १८ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड मो. नं. ९०९६३०७०७७ यांनी या कार्यालयात त्यांच्या स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव- संजीवनी पुंडलिक मस्के वय १८ वर्षे, रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड. सदर व्यक्तीचा राहते घर बाभुळगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक १८.०५.२००७ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

तरी वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ, चिखलवाडी, नांदेड

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री पुंडलिक बळीराम मस्के वय ४३ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड मो. नं. ९०९६३०७०७७ यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा सौरव पुंडलिक मस्केचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव- सौरव पुंडलिक मस्के वय १६ वर्षे, रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड. सदर व्यक्तीचा राहते घर बाभुळगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक २५.०६.२००९ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

तरी वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नांदेड प्रशासकीय इमारत हिंगोली गेट जवळ, चिखलवाडी, नांदेड

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री संतोष संभाजी मस्के वय ४५ रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड मो. नं. ९९७०९४३२९२ यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा श्रीकांत संतोष मस्केचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्यांचे नाव- श्रीकांत संतोष मस्के वय १६ वर्षे, रा. बाभुळगाव ता. जि. नांदेड. सदर व्यक्तीचा राहते घर बाभुळगाव ता. जि. नांदेड या ठिकाणी दिनांक १५.०६.२००९ या दिवशी जन्म झाला असून, जन्म प्रमाणपत्र मिळणेकरीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २९.०९.२०२५ रोजी तहसील कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

तरी वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

तहसीलदार नांदेड करिता

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२५५/२०२५
पुढील तारीख-०६.०१.२०२६

अर्जदार : ०१. महेमुद अमद पठाण, वय-३६ वर्षे, व्यवसाय -व्यापार, रा. पोचम्मा गल्ली, कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड. ०२. लियाकत पाशा अहेमद खान पठाण, वय - ३४ वर्षे, व्यवसाय - व्यापार, रा. पोचम्मा गल्ली, कुंडलवाडी, ता. विलोली जि. नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हे मयत जमनाबी मोलाना पठाण यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ हे मयत जमनाबी मोलाना पठाण यांचे नातू आहेत. अर्जदारांचे आजोबा फार वर्षापूर्वी मयत झालेले असुन अर्जदारांचे वडील यांचा मृत्यू दिनांक ०२.०२.२०१८ रोजी झाला व आई नामे जहिरावी यांचा मृत्यु दिनांक ०१.११.२००६ मध्ये झाला असुन अर्जदार यांची आज्जी मयत जमनाबी मोलाना पठाण यांचा मृत्यू दिनांक ०८.०२.२०१३ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ व ०२ यांना मयत जमनाबी मोलाना पठाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिर प्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/११/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बिलोली

सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर,
बिलोली

## जाहीर प्रगटन

मौजे असदुल्लाबाद पीरबुऱ्हाणनगर गल्ली नंबर ६ नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. ५६ पैकी प्लॉट नं. ९२ चा उत्तरेकडील अर्धा भाग साईज पूर्व-पश्चिम-३६ फुट व उत्तर दक्षिण-२० फुट एकूण क्षेत्रफळ ७२० चौरस फुटाचा प्लॉट १. पेरका सिद्धी सदानंद, २ पेरका शिवम सदानंद, ३ प्रणवी सदानंद पेरका सर्व रा. व्यंकटपूर जि. मेदक यांचेकडून मिर्झा नवाब बेग मकबूल बेग रा. हमालपुरा, विष्णूनगर, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतु:सिमा–**

पूर्वेस- सिराज यांचे घर
पश्चिमेस :- १५ फुट रुंद रोड.
दक्षिणेस :-शेख गफुर शेख इब्राहीम यांनी खरेदी केलेला भाग.
उत्तरेस:-मलय्या यांनी विक्री केलेले घर.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, हक्क, आक्षेप जे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
मिर्झा नवाब बेग मकबूल बेग
रा. हमालपुरा, विष्णूनगर, नांदेड
मो. ९८५०५५१८७६

## जाहीर प्रगटन

मौजे असदुल्लाबाद पीरबुऱ्हाणनगर गल्ली नंबर ६ नांदेड मनपा हद्दीतील सर्व्हे नं. ५६ पैकी प्लॉट नं. ९२ दक्षिणेकडील अर्धा भाग साईज मालमत्ता क्रमांक १-१३-१८४ साईज उत्तर-दक्षिण-२० फुट व रुंदी पूर्व-पश्चिम-३६ फुट, एकूण क्षेत्रफळ ७२० फुटाचा प्लॉट १. पेरका सिद्धी सदानंद, २ पेरका शिवम सदानंद, ३ प्रणवी सदानंद पेरका सर्व रा. व्यंकटपूर जि. मेदक यांचेकडून शेख गफुर शेख इब्राहीम रा. गल्ली नं. १३, पीरबुऱ्हाणनगर नांदेड यांनीविकत घेण्याचा सौदा केला असून, बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतु:सिमा–**

पूर्वेस- समी यांचे घर
पश्चिमेस :- १५ फुट रुंद रोड.
दक्षिणेस :-रऊफ ड्रायव्हर यांनी विक्री केलले घर.
उत्तरेस: याच घरातील मिर्झा नवाब बेग यांनी खरेदी केलेला २० बाय ३६ चा भाग.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, हक्क, आक्षेप जे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व प्लॉटचे खरेदीखत करून घेण्यात येईल. करिता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
शेख गफुर शेख इब्राहीम
गल्ली नं. १३, पीरबुऱ्हाणनगर, नांदेड

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ता. बिलोली यांचे कार्यालय
प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.
अर्ज/आवक क्र.५५८५/२०२५

## जाहीर प्रगटन

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते की, अर्जदार श्री. विजय विठलराव शेटकर, वय ५८ वर्षे, धंदा-शेती रा. लोहगांव ता. बिलोली यांनी या कार्यातयात हजर राहून नामे कु. विरा विजय शेटकर या मुलीचे जन्म, मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधिल कलम ११ (२) व (३) अन्वये दि.१५/०९/२०२५ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार यांची मुलगी नामे कु. विरा विजय शेटकर, रा. लोहगाव ता. बिलोली यांचा जन्म दि.२८/०१/२०१८ रोजीची नोंद ग्राम पंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय लोहगांव ता. बिलोली, जि. नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, अर्जदार यांची मुलगी नामे कु. विरा विजय शेटकर, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासून पंधरा दिवसात या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक ३०/१०/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी
बिलोली


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## राज्य नाट्य स्पर्धेतील अस्वस्थ वल्ली नाटकाने पु. लं. देशपांडेंच्या आठवणी केल्या जाग्या

### सांस्कृतिक कार्य विभागाच्या राज्य नाट्य स्पर्धेत वाढतोय प्रेक्षकांचा उत्साह

**नांदेड (प्रतिनिधी)–** सांस्कृतिक कार्य विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजन करण्यात आलेल्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२५ - २०२६ च्या प्राथमिक फेरीत नांदेड केंद्रावर झपूर्झा फाऊंडेशन, परभणी च्या वतीने विनोद डावरे प्रमोद लिखित आणि दिग्दर्शित 'अस्वस्थ वल्ली' हे नाटक सादर करण्यात आले. शंकरराव चव्हाण नाट्यगृह नांदेड येथे झालेल्या या प्रयोगाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

पु. लं. देशपांडे अर्थात भाई यांच्या १०६ व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी निर्माण केलेली ७ पात्रे ही आपल्या निर्मात्याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी थेट स्वर्गात जातात. भाईंना आपलीच मुले स्वर्गात आल्याचे एकीकडे दुःख तर खूप वर्षानंतर भेट होत असल्याचा आनंदही होतो. भाईंची



ही मुले भाईंच्या सहवासातला काळ आणि आजचा काळ यावर काय भाष्य करतात.

विशेष म्हणजे, फुलराणी ही देखील त्याच वेळी पु. लं.ना भेटायला स्वर्गात जाते. कल्पनेला वास्तवाचे भान ठेवून या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. स्वर्गात आलेल्या एकूण पात्रांपैकी नारायण आणि फुलराणी या दोन पात्रांची प्रत्यक्ष भेट झाल्याचे पुलंनी कुठे लिहिलेले नाही म्हणून, ते २ वगळता बाकी पात्रे जेव्हा प्रवेश करतात तेव्हा भाई प्रत्येकाची ओळख करून देतात. स्वर्ग, इंद्रदेव, यमराज, सुनिताबाई आणि भाईंची कुटी तिथे या सर्वांची भेट आणि संवाद या काल्पनिक नाट्य संहितेचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे.

या नाटकातील पु. ल. देशपांडे यांची भूमिका महेश जोशी यांनी केली तर सुनिताबाई यांची भूमिका अनुजा पालेकर यांनी केली. नारायण (संकेत गाडेकर), अंतुबरवा (सुभाष जोशी), फुलराणी (ऐश्वर्या डावरे), चितळे मास्तर (महेश रोडे), नाथा कामत (पृथ्वीराज देशमुख), सखाराम गटणे (स्वस्तिक काजे), जामू परीट (पांडूरंग शास्त्री), पेस्तन काका (अमित सरदेशपांडे), इंद्रदेव (कार्तिक खरे), यमराज (वैभव काकडे) , नारदमुनी (सचिन वांगे) यांनी केले.

त्याचप्रमाणे नाटकाला स्वप्नवत करण्यासाठी प्रकाश योजना ही बालाजी दामुके तर नेपथ्य संकेत गाडेकर, श्रीकांत जगदंबे यांनी केले. वेशभूषा यश वाकळे व वैशाली जोशी तर रंगभूषा ललिता जोशी यांनी केली. नाटकाला अजून रंगत आणण्यासाठी लाइव्ह संगीताचा प्रयोग करण्यात आला असून, मयंक परळीकर व गणेश राजघुरे त्याला उत्तम साथ दिली. रंगमंच व्यवस्था यादव लोखंडे व मोहन पांचाळ सांभाळून नाटक यशस्वीपणे सादर केले.

आज सायंकाळी ७ वा. तन्मय ग्रुप, नांदेडद्वारा निर्मित, नाथा चितळे लिखित व दिग्दर्शित 'अंधारयात्रा' हे नाटक सादर होणार आहे. नाममात्र रु. १५ व रु. १० मध्ये तिकीट दर असलेली ही राज्य नाट्य स्पर्धा सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, जास्तीत जास्त नाट्य रसिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गुन्ह्यात मदत करतो म्हणून दहा हजार घेणारा सोनखेडचा पोलीस एसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतीच्या वादातून परस्परविरुद्ध दाखल झालेल्या तक्रारी तुमच्या बाजूने मदत करतो, असे म्हणून दहा हजार रुपये घेणाऱ्या एका पोलीस हवालदाराला एसीबीच्या पथकाने रंगेहात पकडले.

सरकारतर्फे पोलीस निरीक्षक करीम खान पठाण आरोपी गणपत नागोराव गिते, वय ५० वर्षे, पद सहायक पोलीस उपनिरीक्षक, ब.नं. ५२८३, पोलीस स्टेशन सोनखेड ता. लोहा जि.नांदेड, रा. कल्याण अपार्टमेंट सिडको रोड, नांदेड (गट क) तक्रादाराने दि. २४ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडिलांचे नावे जवळा ता. लोहा जि. नांदेड येथे २० गुंठे शेतजमीन आहे. दिनांक १३ नोव्हेंबर रोजी त्या शेतात शेतशेजाऱ्याने प्रवेश करून शेतात लावलेली तूर उपटून टाकली आणि त्या ठिकाणी ज्वारी पेरणी करू लागले. त्यावेळी तक्रारदार यांचा भाऊ व वडील हे शेतात गेले असता त्यांच्यामध्ये वाद होऊन मारामारी झाली. त्याबाबत दिनांक १७ रोजी पो.स्टे. सोनखेड येथे तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचे शेत शेजाऱ्यावर गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक गणपत गिते हे करीत आहेत. तसेच त्यांच्या विरोधी तक्रारीवरून तक्रारदार, त्यांचे वडील व भावावर पोलीस स्टेशन सोनखेड येथे एन. सी. दाखल आहे. सहायक पोलीस उपनिरीक्षक गिते यांनी तक्रारदार यांना गुन्ह्यात मदत करण्यासाठी व विरोधकांवर कारवाई करण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी केली होती. त्यावेळी नाईलाजास्तव तडजोडी अंती तक्रारदार यांनी त्यांना १० हजार रुपये दिले होते. दि. २० नोव्हेंबर रोजी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गणपत गिते यांनी तक्रारदार यांना पो.स्टे. सोनखेड येथे कारवाईचे निमित्ताने बोलावून तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीवरून विरोधातील लोकांवर कारवाई करण्यासाठी तसेच तक्रारदारावर दाखल तक्रारीमध्ये मदत करण्यासाठी आणखी १० हजार रुपये दे, असे म्हणून त्यांचेकडे पैशाची मागणी केली होती.

मंगळवार, दि. २५ रोजी पोलीस स्टेशन सोनखेड येथे तक्रारदार यांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातील लोकांवर कारवाई करण्यासाठी तसेच तक्रारदार यांना मदत करण्यासाठी शासकीय पंचासमक्ष १० हजार रूपये लाचेची स्वतः मागणी करून तडजोडी अंती ५ हजार रुपये स्वीकारण्यास सहमती दिल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे. २५ नोव्हेंबर रोजी आरोपी लोकसेवक यांनी पोलीस स्टेशन सोनखेड येथे तक्रारदार यांचेकडून शासकीय पंचांसमक्ष ५ हजार रुपये लाच रक्कम स्वतः स्वीकारली आहे. अंगझडतीत नगदी १५ हजार रूपये, एक तोळ्याची गळ्यातील सोन्याची चैन, दोन सोन्याच्या अंगठ्या प्रत्येकी पाच ग्रॅमची चांदीची अंगठी, फास्टट्रॅक कंपनीची एक घड्याळ, विवो कंपनीचा मोबाईल. मोबाईल हॅन्डसेट तपासणी करून आवश्यकता असल्यास जप्त करण्याची तजवीज ठेवली आहे. आरोपी लोकसेवक यांचे घराची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. पो. स्टे. सोनखेड, ता. लोहा, जि. नांदेड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून, गुन्हा दाखल झाल्यानंतर अटक करण्याची तजवीज ठेवली आहे, अशी माहिती ला. प्र. वि. पो. नि माधुरी यावलीकर यांनी दिली आहे.

## अर्धापुरात विविध अपघातात ५ जखमी; जगद्गुरू नरेंद्रचार्य रुग्णवाहिकेची मदत

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** अपघाताच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, अपघातात मृत्यूंचाही आकडा वाढत आहे. सोमवारी दोन तर मंगळवारी दोन अपघात झाले असून, या अपघातात पाच जण जखमी झाले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अपघाताचे प्रमाण कमी व्हावे यासाठी प्रशासनाकडून नियोजनाचा अभाव दिसून येत आहे. सोमवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी चार वाजता दुचाकीसमोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप होऊन विश्वनाथ उत्तमराव पवार वय ३२ वर्षे रा. निवघा ता. मुदखेड हे जखमी झाले आहेत. तर सोमवारीच सायंकाळी सहा वाजताच्या



सुमारास नांदेड - हिंगोली रोडवर तामसा पाटीजवळ पाठीमागून येणाऱ्या कारची दुचाकीला धडक बसली. यात शेख जमीर शेख रजाक वय ४२ वर्षे रा. वसमत जिल्हा हिंगोली हे जखमी झाले आहेत.

मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी भोकर-नांदेड रोडवर येळेगाव पाटीजवळ कार समोर वन्य प्राणी आल्याने प्राण्याचा बचाव करताना कारवरील ताबा सुटल्याने अपघात झाला. यावेळी नितीन गोपाळराव नाईकवाडे वय ते ३० वर्षे रा. मालेगाव ता.अर्धापूर हे जखमी झाले आहेत. तर मंगळवार, दि.२५ रोजी नांदेड- अर्धापूर रोडवर खडकुत पाटीजवळ अचानक दुचाकीसमोर कुत्रा आल्याने गाडी स्लिप झाली. अनुसयाबाई हनुमंत गुंडे वय ५५ वर्षे रा. गुंडेवाडी ता. लोहा, शंकर गणपती सूर्यवंशी वय ४० वर्षे रा. बारड ता. मुदखेड हे जखमी झाले आहेत. वरील अपघातात काहींची प्रकृती चिंताजनक आहे तर काही गंभीर जखमी आहेत. सदर चारही अपघाताची माहिती मिळताक्षणी जगद्गुरू नरेंद्रचार्य संस्थान नाणिजधाम रुग्णवाहिका चालक राजू पाचंगे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले.

## काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्षपदी मुन्तजीबोद्दीन यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नांदेड जिल्हा काँग्रेस कमेटी (उत्तर) च्या कार्यकारिणीला मान्यता दिली आहे. प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष अ‍ॅड. गणेश पाटील यांनी नवीन कार्यकारिणी घोषित केली आहे. नांदेड जिल्हा काँग्रेस कमेटी (उत्तर) च्या जिल्हा कार्याध्यक्षपदी माजी नगरसेवक मुन्तजीबोद्दीन यांची नियुक्ती करण्यात आली.

मुन्तजीबोद्दीन गेल्या १४ वर्षापासून नांदेड काँग्रेस कमिटीचे प्रवक्ता म्हणून काम पाहात आहेत. या नियुक्तीबद्दल मुन्तजीबोद्दीन यांनी नांदेडचे खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष (उत्तर) राजेश पावडे, नांदेड महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहेत.

## विजयाबाई जहागीरदार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** दै. पुण्यनगरीचे नांदेड जिल्हा प्रतिनिधी कालिदास जहागीरदार यांच्या मातोश्री आणि भाग्यनगरमधील ज्येष्ठ रहिवासी श्रीमती विजयाबाई माणिकराव जहागीरदार यांचे मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी दुपारी २.१५ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी रात्री ८.३० वाजता शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले महेश, कालिदास, मुलगी सौ. प्राची गोसावी, जावई, २ सुना, नातवंडे, ५ भाऊ, ५ बहिणी असा परिवार आहे.

## रुक्मीनबाई चौधरी यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मालेगाव मार्गावरील प्रेमनगरमधील रहिवासी रुक्मीनबाई दिगंबरराव चौधरी यांचे दि.२५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांची अंत्ययात्रा राहते घर प्रेमनगर जैन मंदिर जवळ मालेगाव रोड नांदेड येथून मंगळवारी दुपारी निघाली आणि सायंकाळी ४ वाजता शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्ती यंत्रचालक डी. डी. चौधरी यांच्या त्या आई तर किनवटचे पत्रकार आशिष देशपांडे यांच्या त्या आजी सासू होत.

## भागवत येरावार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) –**श्रसिडको येथील ओमप्रकाश किराणा दुकानचे मालक भागवत बळीराम येरावार यांचे मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता निधन झाले. ते वासवी क्लबचे माजी अध्यक्ष साई येरावार आणि विद्यमान अध्यक्ष संदीप येरावार यांचे वडील होत. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता सिडको येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## विश्वनाथराव दासे यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी) –**तालुक्यातील कामठा बु. येथील ज्येष्ठ नागरिक विश्वनाथराव नारायण दासे यांचे मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६. २५ वा. निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी दु.१ वा. त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

विश्वनाथ दासे यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. विमा प्रतिनिधी रामकिशन विश्वनाथ दासे, शिवानंद विश्वनाथ दासे यांचे ते वडील होत.

## शिक्षकांनी अंतर्मुख होण्याची गरज –माजी कुलगुरू डॉ. बी. पी. बंडगर

**नांदेड (प्रतिनिधी)–** एक पुस्तक शंभर शिक्षकांच्या बरोबरीचे असते आणि एक चांगला शिक्षक संपूर्ण ग्रंथालयाच्या तोलामोलाचा असतो, अशी व्याख्या आपण ऐकत आलो आहोत. पूर्वी शिक्षकांची अध्यापनशैली देणगीभावाने आणि निष्ठेने परिपूर्ण होती. मात्र काळाच्या ओघात शिक्षणव्यवस्थेमध्ये आणि शिक्षकांच्या भूमिकेमध्ये मोठे बदल झाले आहेत. आजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहता शिक्षकांनी स्वतःकडे अंतर्मुख होण्याची तातडीची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील



रसायनशास्त्र संकुलाचे माजी संचालक डॉ. बी. पी. बंडगर यांनी केले.

ते दि. २२ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या अधीसभा सभागृहात आयोजित कुलगुरू व्याख्यानमाला या कार्यक्रमातील पहिल्या व्याख्यानात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते. यावेळी समन्वयक डॉ. एस. जी. गट्टानी, डॉ. कृष्णा चैतन्य, रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून, पहिल्या पुष्पात डॉ. बंडगर यांनी जगावे तरी कसे, या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले.

आपल्या प्रभावी संवादात ते म्हणाले की, आयुष्य तीन गोष्टींकडून प्रेरणा घेऊन जगावे. निसर्गाकडून : निरपेक्ष भावनेने जगणाऱ्या आणि कोणताही मोबदला न घेता ऊर्जा देणाऱ्या निसर्गाकडे पाहून जगण्याची प्रेरणा मिळते. मित्रांकडून : जीवनातील वेदना कमी करणारे, सदैव मदतीसाठी धावून येणारे खरे मित्र जीवनाला अर्थपूर्ण करतात. शिक्षकांकडून : जगावे कसे हे शिकवणारे, जीवनाला दिशा देणारे शिक्षक आपल्याला घडवत राहतात आणि त्यांच्या कृतज्ञतेखालीच आपण मोठे होत जातो. आपल्या जगण्याने इतरांना हेवा वाटावा असे जगावे, असा प्रेरणादायी संदेश देत त्यांनी व्याख्यानाचा समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोणे यांनी केले.

### नांदासौख्यभरे

**सावंत–मनुरकर**

सौ. रंजना व दत्तात्रय (डी. पी.) सावंत यांची कनिष्ठ कन्या चि.सौ.कां. पुनम हिचा शुभ विवाह सौ. सुंदर व गोविंदराव मनुरकर यांचे द्वितीय चिरंजीव गजानन यांचेसमवेत आज बुधवार, दि. २६ नोव्हेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.११ वाजता अनुसया गार्डन मंगल कार्यालय, नांदेड-हिंगोली रोड, आसना ब्रिज जवळ, नांदेड येथे संपन्न होत आहे.

वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

**–मुख्यसंपादक**

## न्यायालयात पोलिसांशी हुज्जत घालणाऱ्या एका विद्यार्थ्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा न्यायालयात एका खून प्रकरणातील आरोपी सोबत बोलत असताना त्याचे छायाचित्रीकरण, व्हीडीओचित्रीकरण करताना पोलिसांनी त्याला रोखले असता त्या युवकाने पोलिसांसोबत बेशिस्त वर्तन केले. या संदर्भाने वजिराबाद पोलिसांनी त्या युवकाविरुद्ध अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. गोंधळ घालणारा युवक विधीशाखेचा विद्यार्थी आहे, असे सांगण्यात आले.

मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर रोजी सकाळी न्यायालय परिसरातील पहिल्या मजल्यावर अतिरिक्त सत्र न्यायालय येथे नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका दुहेरी खून प्रकरणातील आरोपी मोहम्मद मोहियोद्दीन फारूखी यांना न्यायालयात तारेखवर आणले असताना त्यांचा मुलगा मोहम्मद उमर त्यांना भेटायला आला. तो आपल्या वडिलांशी बोलत होता. पण नंतर त्याने वडिलांचे फोटोग्राफ आणि व्हीडीओ शुटींग केले. यावर पोलिसांनी आक्षेप घेतला. तेंव्हा त्याने पोलिसांसोबत बेशिस्त वर्तन करत सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालून शांततेचा भंग केला. या संदर्भाची तक्रार पोलीस अंमलदार एस. एन. बनसोडे यांनी दिल्यानंतर वजिराबाद पोलिसांनी मोहम्मद उमर मोहम्मद मोहियोद्दीन विरुध्द मुंबई पोलीस कायदा कलम ११०/११७ प्रमाणे अदखल पात्र गुन्हा क्रमांक ६११/२०२५ दाखल केला आहे. ही घटना न्यायालय परिसरात घडली तेंव्हा न्यायालय परिसरात काहीसा गोंधळ उडाला होता. परंतु उपस्थितीत पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणा आणली.

## बिलोली पोलिसांनी तीन गुन्हेगारांना पाच महिन्यांसाठी केले जिल्ह्यातून हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी)–** बिलोली तालुक्यात सतत गुन्हे करून दहशत पसरविणाऱ्या तीन अट्टल गुन्हेगारांना बिलोली पोलिसांच्या शिफारशीवरून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पाच महिन्यांसाठी नांदेड आणि लातूर जिल्ह्यातून हद्दपार केले आहे.

पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनसुद्धा त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने नांदेड जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांच्याकडून अशा गुन्हेगारास कारागृहात स्थानबद्ध तसेच हद्दपार करण्यासंबंधाने कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले होते.

त्यावरुन नमूद हद्दपार आरोपी हे प्रॉपर बिलोली येथे मटका, जुगार खेळवितात व अवैधरित्या दारू विक्री करतात. त्यामुळे सार्वजनिक अशांतता निर्माण होऊन कोणत्याही क्षणी त्यांच्याकडून गंभीर अपराध घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच सदर आरोपी हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून त्यांची गावात व परिसरामध्ये दहशत निर्माण



झाली आहे. त्यांच्या विरुध्द वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करून देखील त्यांच्या वर्तनात सुधारणा झाली नाही. तसेच ते लोकांकडून बेकायदेशिररित्या पैसे घेवून त्यांना मटक्याचे आकडे देवून मटका जुगार खेळविण्याचे काम करीत होते.

संकेत रविउदय बिलोलीकर रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड याच्या विरुध्द बिलोली येथे तीन, देवराव गंगाधर भिसे रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड याच्याविरुध्द बिलोली येथे तीन आणि रफिक बाबू शेख रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड याच्याविरुध्द बिलोली ठाण्यात ४ गुन्हे न्यायप्रविष्ठ आहेत. त्यांच्या या वृत्तीस आळा बसावा, त्यांच्यावर वेळीच प्रतिबंधक कारवाई करणे गरजेचे असल्याने सदर आरोपींना हद्दपार करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक कार्यालयात सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव मंजूर होण्याकरिता पाठपुरावा सुरू होता. त्यानुसार बिलोलीच्या उपविभागीय दंडाधिकारी क्रांती डोंबे यांनी या ३ जणांना नांदेड व लातूर या जिल्ह्यातून पाच महिन्यांकरिता हद्दपार केले आहे. सदरचे हद्दपार आदेश दि. २० नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम ५६(क) (ख) अन्वये निर्गमीत करण्यात आले आहेत. सदर आरोपींना आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असून उपविभागीय दंडाधिकारी, बिलोली यांच्या परवानगी शिवाय ते नांदेड व लातूर जिल्ह्यात पाच महिण्यांकरीता प्रवेश करु शकणार नाहीत.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com